वर्ष: 7 अंक: 02
16-31 जुलै, 2026 (नि:शुल्क)

# न्यू इंडिया समाचार





# युवा शक्ती

## शिक्षणाद्वारे सामर्थ्याची झेप

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 देशातील युवा शक्तीला केवळ साक्षरच नव्हे, तर कुशल , आत्मनिर्भर आणि प्रतिस्पर्धी बनवत आहे. व्यावहारिक ज्ञान, आधुनिक तंत्रज्ञान आणि कौशल्य विकासावर केंद्रित, या धोरणाने भारतातील युवकांसाठी संधींचे नवीन मार्ग खुले केले आहेत...

आम्हाला फॉलो करा @NISPIBIndia

# समुद्रापासून आकाशापर्यंत अधिक सुरक्षित आणि आत्मनिर्भर बनणारा भारत



*वर्ष 2026 चे अर्धे वर्ष उलटून गेले आहे. या 6 महिन्यांच्या कालावधीत, 'मन की बात' मध्ये देशवासियांच्या अनेक उल्लेखनीय कामगिरींची चर्चा करण्यात आली आहे. जून महिन्यातही देशाने असेच काही महत्त्वाचे यश संपादन केले आहे, ज्याचा प्रत्येक नागरिकाला अभिमान वाटतो. हे यश समुद्रापासून आकाशापर्यंत भारताला अधिक सुरक्षित आणि आत्मनिर्भर बनवत आहे. आकाशवाणीवर प्रसारित होणाऱ्या मन की बात ' कार्यक्रमाच्या 135 व्या भागात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अनेक महत्वपूर्ण विषयांचा उल्लेख केला . सादर आहे प्रमुख संपादित अंश ....*

- **नौदल :** अलीकडेच, कोलकाता येथे 'आयएनएस दुनागिरी', 'आयएनएस संशोधक' आणि 'आयएनएस अग्रय' या जहाजांचा भारतीय नौदलाच्या ताफ्यात समावेश करण्यात आला. या जहाजांच्या आरेखनापासून निर्मिती पर्यंत सर्वकाही स्वदेशी आहे.
- **सुरक्षित आणि आत्मनिर्भर :** जून महिन्यातच , डीआरडीओने स्वदेशी 'लांब पल्ल्याच्या जमिनीवर मारा करणाऱ्या क्रूझ क्षेपणास्त्राची' यशस्वी चाचणी घेतली. हे क्षेपणास्त्र डीआरडीओची प्रयोगशाळा आणि भारतीय उद्योग क्षेत्रातील भागीदार यांनी संयुक्तपणे विकसित केले होते. याचाच अर्थ , समुद्रापासून ते आकाशापर्यंत भारत अधिक सुरक्षित आणि आत्मनिर्भर बनत आहे.
- **रोजगाराच्या संधी :** C-295 विमान हे 'मेक इन इंडिया' आहे आणि त्याने आपले पहिले उड्डाण पूर्ण केले आहे. अशी 40 विमाने भारतातच तयार केली जात आहेत. यामुळे एमएसएमई आणि एरोस्पेस क्षेत्रांना अधिक बळ मिळत आहे. रोजगाराच्या नवीन संधी निर्माण होत आहेत.
- **आंतरराष्ट्रीय योग दिन :** यावर्षी जगभरात 2,500 हून अधिक ठिकाणी योग कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. आपल्या देशातल्या कोट्यवधी लोकांनी विविध ठिकाणी आयोजित योग कार्यक्रमांमध्ये सहभाग घेतला.
- **जागतिक योगासन अजिंक्यपद स्पर्धा :** जून महिन्यात अहमदाबाद इथे आयोजित 'जागतिक योगासन स्पर्धेत ' भारताने एकूण 114 पदके जिंकली, ज्यात 102 सुवर्णपदकांचा समावेश आहे. या स्पर्धेच्या पदक तालिकेत भारताने प्रथम क्रमांक पटकावला. सर्व विजयी खेळाडूंचे खूप खूप अभिनंदन.
- **'हरगिला आर्मी' :** आसाममध्ये 'हरगिला' हा एक दुर्मिळ पक्षी आढळतो. ज्या पक्षाला कधी काळी अशुभ म्हणून आसपास फिरकूही दिले जात नव्हते , तोच आज गावांची ओळख बनू लागला आहे. हजारो ग्रामीण महिला 'हरगिला' पक्ष्याला वाचवण्यासाठी पुढे आल्या. आज त्या 'हरगिला आर्मी' म्हणून ओळखल्या जातात.
- **प्रतिभेचे दर्शन घडवण्याची संधी :** नागालँडची "विमेन फुटसाल लीग" तेथील मुलींना आपली प्रतिभा दाखवण्याची एक उत्तम संधी देत आहे. फुटसालला इनडोअर फुटबॉलसुद्धा म्हटले जाते. मी अशा उपक्रमांसाठी नागालँडच्या लोकांचे कौतुक करतो. असे प्रयत्न देशाच्या इतर भागांनाही मोठी प्रेरणा देतात.
- **नालंदा विद्यापीठ :** हजारो वर्षे जुने नालंदा विद्यापीठ आता एका नव्या अवतारात भारताचे भवितव्य घडवत आहे. दोन वर्षांपूर्वी मला नालंदा विद्यापीठाच्या नवीन परिसराचे लोकार्पण करण्याची संधी मिळाली होती. नालंदा विद्यापीठाने आपली शास्त्रार्थाची प्राचीन परंपरा पुन्हा जिवंत केली आहे.
- **युनेस्को जागतिक वारसा :** माणूस निसर्गाशी एकरूप होऊन किती अद्भुत गोष्टी निर्माण करू शकतो, याचे मेघालयातला रूट ब्रिज हे उत्तम उदाहरण आहे. हा आपल्या देशाचा , या मातीचा एक अमूल्य ठेवा आहे. आता भारताने मेघालयातल्या या रूट ब्रिजचा युनेस्को जागतिक वारसा स्थळ यादीत समावेश करण्यासाठी अर्ज केला आहे.
- **गणपती बाप्पा :** असा प्रयत्न करा की तुमच्या घरी, सोसायटीत किंवा आजूबाजूच्या ठिकाणी गणपती बाप्पाच्या ज्या मूर्तीची प्रतिष्ठापना होईल, ती आपल्या देशाच्या मातीपासून बनलेली असेल. ती आपल्या कुंभारांच्या आणि स्थानिक कलाकारांच्या हातांनी तयार झालेली असावी. जे लोक गणपतीच्या मूर्ती बनवतात, त्यांनाही माझी विनंती आहे की त्यांनी मातीच्या मूर्तींना प्राधान्य द्यावे. ▪

'मन की बात' पूर्ण ऐकण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा.

न्यू इंडिया
समाचार
वर्ष: 7, अंक: 02 । 16-31 जुलै, 2026

प्रधान संपादक
धीरेंद्र ओझा
प्रधान महासंचालक
पत्र सूचना कार्यालय , नवी दिल्ली

मुख्य सल्लागार संपादक
संतोष कुमार

वरिष्ठ सहाय्यक सल्लागार संपादक
पवन कुमार

सहाय्यक सल्लागार संपादक
अखिलेश कुमार
चंदन कुमार चौधरी

भाषा संपादक
सुमित कुमार (इंग्रजी)
रजनीश मिश्रा (इंग्रजी)
नदीम अहमद (उर्दू )

वरिष्ठ डिझायनर
फूलचंद तिवारी

डिझायनर
अभय गुप्ता
सत्यम सिंह



**13 भाषांमध्ये उपलब्ध न्यू इंडिया समाचार वाचण्यासाठी येथे क्लिक करा.**


https://newindiasamachar.pib.gov.in/news.aspx

**न्यू इंडिया समाचारचे जुने अंक वाचण्यासाठी क्लिक करा.**

https://newindiasamachar.pib.gov.in/archive.aspx

न्यू इंडिया समाचार बद्दल नियमित अपडेटसाठी फॉलो करा:-@NISPIBIndia

# आतील पानांवर...




## मुखपृष्ठ कथा

6 वर्षांपूर्वी 29 जुलै रोजी जाहीर झालेल्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 मुळे सर्वांपर्यंत शिक्षण पोहचले , उच्च शिक्षणाची पायाभूत सुविधा बळकट झाली , कौशल्य विकास व रोजगाराच्या संधींमध्ये वाढ झाली . शैक्षणिक धोरणामुळे झालेल्या बदलांमुळे, आता 'अमृत पिढी' म्हणून ओळखले जाणारे युवक बनले आहेत विकसित भारताचे सारथी... |10-21

**12 वा आंतरराष्ट्रीय योग दिन**

## सर्वांना जोडणारा सर्वांना एकत्र आणणारा योग

भारताची हजारो वर्षे जुनी योग परंपरा संपूर्ण जगासाठी आशेचा एक नवीन किरण बनली आहे |30-33



वृत्त सार |4-5

व्यक्तिमत्व : कादंबिनी गांगुली
भारतात वैद्यकीय शिक्षण घेतल्यानंतर वैद्यकीय व्यवसाय करणाऱ्या पहिल्या महिला |6

'प्रगती ' द्वारे ऊर्जा , उद्योग आणि परिवहनाला मिळाली गती
पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'प्रगती'च्या 52 व्या बैठकीचे अध्यक्षपद भूषवले |7

राष्ट्र प्रथम, भारताचा सर्वात मोठा मंत्र
रिपब्लिक समिट -2026 ला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले संबोधित |8-9

दिल्लीत 6 पदरी बोगदा , उत्तर प्रदेशात नवीन महामार्ग
केंद्रीय मंत्रिमंडळाचा निर्णय |22-23

भविष्यातील अर्थव्यवस्थेचे नेतृत्व करणारा भारत
पीएम विकसित भारत रोजगार योजनेत 2,400 कोटी रुपये निधी वितरित |24-25

बंगाल रचणार इतिहास... भारताची वाढेल गती
पंतप्रधान मोदी यांनी पीएम-किसान चा 23 वा हप्ता केला जारी |26-27

प्रवेशद्वार म्हणून उदयाला येत आहे 'ओदिशा'
47,000 कोटी रुपयांच्या विकास प्रकल्पांची भेट |28-29

पद्म पुरस्कार 2026 : निष्ठा आणि समर्पणाला वंदन
विशेष लेखात देशाच्या 'नायकांच्या ' प्रेरक कथा |34-38

भारत ग्लोबल साऊथच्या आकांक्षा आणि अपेक्षांचा बुलंद आवाज
सलग 8 व्यांदा जी -7 मध्ये भारताला मिळाले निमंत्रण |39-41

भारत आणि सेशेल्सच्या मैत्रीची सुवर्णमहोत्सवी 50 वर्षे
सेशेल्सच्या राष्ट्रीय दिनाच्या सुवर्ण महोत्सव सोहळ्यात सहभागी झाले पंतप्रधान मोदी |42-43

महिला क्रीडा क्षेत्रासाठी सुवर्णयुग: खेलो इंडिया ते जागतिक मंचापर्यंत मजल
एफआयएच : हॉकी महिला नेशन्स कप 2026 |44

**प्रकाशक : कंचन प्रसाद,** महासंचालक, सीबीसी (केंद्रीय संचार ब्युरो ) **पत्र व्यवहार आणि ईमेलसाठी पत्ता :** खोली क्रमांक -1077, सूचना भवन, सीजीओ कॉम्प्लेक्स, नवी दिल्ली- 110003. **ईमेल - response-nis@pib.gov.in, आर. एन. आय . क्रमांक DELHIN/2020/78812**

## संपादकांच्या लेखणीतून...

# विकसित भारत : अमृत पिढीचा अमृत संकल्प

सप्रेम नमस्कार

उत्तिष्ठत जाग्रत प्राप्य वरान्निबोधत।

याचा अर्थ आहे - 'उठा, जागे व्हा आणि लक्ष्य साध्य होईपर्यंत थांबू नका'

कठोपनिषदातील हा मंत्र स्वामी विवेकानंद यांनी युवकांचा जीवन मंत्र असल्याचे म्हटले होते. आज, जेव्हा भारत जगातील सर्वाधिक युवा लोकसंख्या असलेला देश आणि सुमारे 65 टक्के लोकसंख्या 35 वर्षांखालील वयोगटातील आहे , तेव्हा हा संदेश पूर्वीपेक्षा अधिक प्रासंगिक ठरतो. भारत आज सकारात्मक परिवर्तनाच्या एका महत्त्वपूर्ण वळणावर आहे.

शिक्षण, कौशल्य विकास, क्रीडा, उद्योजकता आणि नवोन्मेष यांसारख्या सर्वच क्षेत्रांमध्ये युवक या बदलांचे सर्वात प्रभावी चालक म्हणून पुढे येत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी जेव्हा देशाच्या चार प्रमुख शक्ती - गरीब. युवक , अन्नदाता आणि नारीशक्तीबद्दल बोलतात, तेव्हा त्यात युवाशक्तीला विशेष स्थान प्राप्त आहे. विकसित भारताची संकल्पना साकारण्यात युवकांची भूमिका सर्वात महत्वपूर्ण आहे.

'अमृत पिढी' म्हणून ओळखले जाणारे हे युवक आज केवळ भविष्याची स्वप्ने पाहत नाहीत, तर 'विकसित भारत @2047' चे सह-निर्माते बनून त्यासाठी भक्कम पायाभरणी करत आहेत. 'विकसित भारत यंग लीडर्स डायलॉग ' सारख्या व्यासपीठांच्या माध्यमातून लाखो युवक राष्ट्रीय मोहिमांमध्ये सहभागी होत आहेत.

मागील 12 वर्षांमध्ये , भारत सरकारने युवकांमधील क्षमता ओळखून त्यांना स्टार्टअप्स, सार्वजनिक सेवा, क्रीडा व सर्जनशील क्षेत्रांमध्ये पुढे जाण्याच्या अभूतपूर्व संधी दिल्या आहेत. आज भारत जगातील तिसरी सर्वात मोठी स्टार्टअप परिसंस्था आहे आणि त्याचे नेतृत्व याच युवकांच्या हातात आहे.

शिक्षण क्षेत्रातही हा बदल स्पष्टपणे दिसून येतो. आता प्राधान्य केवळ शिक्षणापर्यंत पोहोच वाढवणे हे नाही, तर दर्जेदार शिक्षण सुनिश्चित करण्याचे आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 या परिवर्तनाचा मजबूत आधारस्तंभ बनला आहे. 29 जुलै 2026 रोजी एनईपीला सहा वर्षे पूर्ण होत आहेत . हे धोरण अमृत पिढीला भविष्यासाठी तयार करतानाच विकसित भारत @2047 च्या लक्ष्य प्राप्तीला नवी दिशा आणि नवी गती देत आहे.

याशिवाय , व्यक्तिमत्त्व या मालिकेत भारताच्या पहिल्या प्रशिक्षित महिला डॉक्टर कादंबिनी गांगुली , आंतरराष्ट्रीय योग दिन , पद्म सन्मान , महिला हॉकी खेळाडू आणि धावपटूंचा जागतिक स्तरावर वाढलेला नावलौकिक यांसह पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे गेल्या पंधरा दिवसांमधील कार्यक्रम यात समाविष्ट करण्यात आले आहेत.

तसेच , पाक्षिकाच्या आतील पानावर मन की बात आणि मलपृष्ठावर भारतीय नौदलाची तीन आधुनिक जहाजे नौदलाच्या ताफ्यात समाविष्ट झाल्यासंबंधी विशेष माहिती दिली आहे.

तुम्ही तुमच्या सूचना आम्हाला पाठवत रहा.

धीरेन्द्र

(धीरेन्द्र ओझा)

हिंदी, इंग्रजी आणि इतर 11 भाषांमध्ये उपलब्ध असलेले हे पाक्षिक वाचा/डाउनलोड करा.
https://newindiasamachar.pib.gov.in/news.aspx

# वाचकांच्या प्रतिक्रिया...




## पाक्षिक वाचल्यामुळे होते मदत

मी रुपेश खान , बांकुरा सदर, पश्चिम बंगाल इथे राहतो. मी एक पत्रकार आहे आणि नियमितपणे न्यू इंडिया समाचार वाचतो. यातून मला खूप मदत मिळते.

**rupeshphoto@gmail.com**

## आशय आणि तंत्रज्ञानदृष्ट्या उत्कृष्ट

न्यू इंडिया समाचारमध्ये सरकारची उल्लेखनीय कामगिरी आणि भावी योजनांबाबत वाचणे सजग नागरिकांसाठी अतिशय महत्वपूर्ण आहे. इतर कुठल्याही पाक्षिकांमध्ये हे विवरण त्यांच्या दृष्टिकोनातून वाचायला मिळते. मी स्वतः एक स्वतंत्र लेखक आहे. त्यामुळे देशाच्या प्रगतीत माहितीची पारदर्शकता मी समजू शकतो. या महायज्ञात या पाक्षिकाच्या माध्यमातून जे योगदान दिले जात आहे, त्याची मुक्त कंठाने प्रशंसा करू इच्छितो.

**विवेक रंजन श्रीवास्तव**

**apaniabhivyakti@gmail.com**

## पाक्षिकामुळे माझ्या ज्ञानात झाली लक्षणीय सुधारणा

मी गुजरातच्या अहमदाबाद येथील रहिवासी आहे. मी गुजरात राज्य पीसीएस आणि यूपीएससी परीक्षेची तयारी करत आहे. पत्र सूचना कार्यालय (पीआयबी) दररोज देशाच्या विकासासाठी सरकार करत असलेल्या उपाययोजनांबाबत आवश्यक माहिती देते. तयारीमध्ये पीआयबीकडून मिळणारी माहिती अतिशय महत्वाची भूमिका बजावते. गेल्या काही महिन्यांपासून मी गुजराती भाषेतील 'न्यू इंडिया समाचार' पाक्षिकाची डिजिटल प्रत वाचत आहे, ज्यामुळे माझ्या ज्ञानात मोलाची भर पडली आहे. माझ्याप्रमाणे अनेक विद्यार्थ्यांना वाचायला खूप आवडते. मात्र मला मोबाईलवर डिजिटल प्रत वाचण्याऐवजी पुस्तक वाचायला जास्त आवडते.

**jaydevsinhdodiya0611@gmail.com**

## परीक्षेच्या तयारीसाठी अत्यंत उपयुक्त पाक्षिक

मी स्पर्धा परीक्षांची तयारी करत आहे. मी तुम्हाला सांगू इच्छिते की परीक्षेच्या तयारीसाठी हे पाक्षिक माझ्यासाठी अतिशय उपयुक्त आहे.

**gavidisravani7@gmail.com**

## विविध प्रकारची माहिती मिळवण्यासाठी हे पाक्षिक अत्यंत उपयुक्त

मी चंदन बसू एका मासिकाचा संपादक आहे . माझे वय ६६ वर्षे आहे. मला 'न्यू इंडिया समाचार' नियमितपणे ईमेलद्वारे प्राप्त होते. विविध प्रकारची माहिती मिळवण्यासाठी हे पाक्षिक मला अत्यंत उपयुक्त वाटते.

**चंदन बसू**

**outlineofindia@gmail.com**


पत्रव्यवहार आणि ईमेलसाठी पत्ता : खोली क्रमांक - 1077, सूचना भवन, सीजीओ कॉम्प्लेक्स, नवी दिल्ली - 110003.

ईमेल- response-nis@pib.gov.in

# जहाज पुनर्वापरात भारत प्रथम

जुनी , निरूपयोगी किंवा सेवेतून निवृत्त झालेली जहाजे मोडून, त्यांचे फेरवापर करण्यायोग्य भाग वेगळे करून त्यांचा वापर करण्यामध्ये जगातील सर्वात अव्वल देश बनण्याचे उद्दिष्ट गेल्या वर्षीच भारताने निश्चित केले आहे. संयुक्त राष्ट्र व्यापार आणि विकास परिषदेच्या ताज्या अहवालानुसार, जागतिक जहाज पुनर्वापरात भारताचा 2024 मध्ये 30.1 टक्के होता. 2025 मध्ये तो 35.4 टक्क्यांपर्यंत वाढला आहे.

याबरोबरच, भारताने 'मॅरिटाइम इंडिया व्हिजन 2030' चे जहाज पुनर्वापराचे लक्ष्य पाच वर्षे आधीच साध्य केले आहे. केंद्रीय मंत्री सर्बानंद सोनोवाल यांनी या यशाचे श्रेय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची धोरणे, सागरी सुधारणा आणि पर्यावरणपूरक जहाज पुनर्वापर प्रणालीला दिले.




## स्वदेशी क्रूझ क्षेपणास्त्राची चाचणी

संरक्षण संशोधन आणि विकास संस्थेने (डीआरडीओ) 15 जून रोजी ओडिशाच्या किनारपट्टीजवळील डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम बेटावरून स्वदेशी बनावटीच्या लांब पल्ल्याच्या जमिनीवरून मारा करणाऱ्या 'क्रूझ' क्षेपणास्त्राची यशस्वी उड्डाण चाचणी घेतली. या चाचणीदरम्यान क्षेपणास्त्राने सर्व निर्धारित उद्दिष्टे यशस्वीपणे पूर्ण केली. हे 'क्रूझ' क्षेपणास्त्र 100 % स्वदेशी बनावटीचे असून, त्याच्या सर्व प्रमुख उप-प्रणाली डीआरडीओच्या विविध प्रयोगशाळा तसेच भारतीय संरक्षण उद्योग भागीदारांनी विकसित केल्या आहेत. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी एलआरएलएसीएमच्या यशस्वी उड्डाण चाचणीबद्दल डीआरडीओचे शास्त्रज्ञ, अभियंते आणि सर्व संरक्षण उद्योग भागीदारांचे अभिनंदन केले.

## संरक्षण उत्पादनात भारताने गाठली नवी उंची

विकसित भारत 2047 चे उद्दिष्ट देशाला आत्मनिर्भर बनवणे, 'मेक इन इंडिया'ला प्रोत्साहन देणे आणि देशात उत्पादन वाढवणे हे आहे. विकसित भारत 2047 च्या संकल्पात आणि प्राधान्यक्रमांमध्ये आत्मनिर्भर भारत, मेक इन इंडिया आणि उत्पादन क्षेत्रातील वाढ यांचा समावेश आहे. परिणामी, संरक्षण उत्पादनातील सातत्यपूर्ण वाढ हे आत्मनिर्भरतेच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. आर्थिक वर्ष 2025-26 मध्ये संरक्षण उत्पादनाने 1.78 लाख कोटींचा विक्रमी स्तर गाठला आहे.





## इटलीला आवडते देवभूमीची लिची, तर दुबईला तेजपूरची!

भारत केवळ शेतीला प्रोत्साहनच देत नाही, तर शेतकऱ्यांना सक्षम करत आहे आणि भारतीय कृषी उत्पादने जागतिक बाजारपेठेत पोहोचवण्यात महत्त्वाची भूमिका बजावत आहे. यामुळेच देवभूमी उत्तराखंडमधील उत्तम प्रतीची लिची इटलीला, तर आसाममधील जीआय-टॅग असलेली तेजपुरी लिची दुबईला पोहोचत आहे. डेहराडूनची लिची तिच्या वैशिष्ट्यपूर्ण गोडव्यासाठी, आकर्षक लाल रंगासाठी, सुखद सुगंधासाठी आणि उत्कृष्ट गराच्या गुणवत्तेसाठी सर्वत्र ओळखली जाते.

कृषी आणि प्रक्रियायुक्त अन्न उत्पादने निर्यात विकास प्राधिकरणाने (एपीडा) उत्तराखंडची 1 मेट्रिक टन लिची पहिल्यांदाच इटलीला पाठवण्याची सोय केली. यामुळे केवळ उत्तराखंडच्या उत्तम दर्जाच्या लिचीचा युरोपियन बाजारपेठेत प्रवेश होणार नाही, तर आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत भारतीय फळांचे स्थानही अधिक मजबूत होईल.

## नाफेडचे चार उपक्रम सुरू... ई-लिलाव पोर्टल NAFEX.in सुरू


सहकार्यातून समृद्धी साधण्याचा सरकारचा मंत्र नॅशनल ॲग्रिकल्चरल को ऑपरेटिव्ह मार्केटिंग फेडरेशन ऑफ इंडिया लिमिटेड (**NAFED**) मध्ये देखील दिसून येतो. नाफेडमध्ये पारदर्शकता वाढवण्यासाठी आणि शेतकऱ्यांचे कल्याण सुधारण्यासाठी, केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शाह यांनी जूनच्या शेवटच्या पंधरवड्यात **NAFEX.in**, दृष्टी, **ERP** आणि नाफेड कल्याण हे उपक्रम एकाच वेळी सुरू केले. केंद्रीय सहकार मंत्र्यांनी सांगितले की, **NAFEX.in** आणि इतर उपक्रम महत्त्वपूर्ण आहेत, कारण 2014 मध्ये नाफेड बंद होण्याच्या मार्गावर होते. आज, सरकारच्या प्रयत्नांमुळे, नाफेड 74 लाख शेतकऱ्यांना सेवा देत असून, त्याची उलाढाल 30,000 कोटी रुपये आणि नफा 500 कोटी रुपये आहे. गेल्या काही वर्षांत, सरकारने कडधान्ये, मका आणि इतर उत्पादनांच्या थेट खरेदीसाठी आवश्यक पायाभूत सुविधा स्थापित केल्या आहेत. सरकारने नाफेड आणि एनसीसीएफला पुढील दोन वर्षांत शेतकऱ्यांकडून सर्व कडधान्ये थेट खरेदी करण्याचे निर्देश दिले आहेत, जेणेकरून मध्यस्थ पद्धत संपुष्टात येईल आणि शेतकऱ्यांना त्यांचे पैसे थेट त्यांच्या खात्यात जमा होतील, याची हमी मिळेल. नाफेडने शेतकरी कुटुंबातील मुलांच्या उच्च शिक्षण आणि व्यावसायिक विकासासाठी शिष्यवृत्ती देण्यासाठी आपल्या नफ्यातील 1 % रक्कम देण्याचा निर्णय घेतला आहे.

## गैर-घरगुती पॅकेज्ड एलपीजी पुरवठा पूर्ववत, हटवले क्षेत्रनिहाय निर्बंध

केंद्र सरकारने उद्योग आणि व्यवसायांना दिलासा देत, बिगर-घरगुती व्यावसायिक एलपीजी पुरवठा पश्चिम आशिया संकटापूर्वीच्या पातळीवर पूर्ववत केला आहे. या श्रेणीतील एलपीजी पुरवठ्यावरील सर्व प्रादेशिक निर्बंध उठवण्यात आले आहेत. शिवाय, संकटाच्या काळात मोठ्या प्रमाणावर स्थगित केलेला एलपीजी पुरवठा, संकटापूर्वीच्या वापराच्या 50 % पर्यंत पूर्ववत करण्यात आला आहे. एलपीजी पुरवठ्यात सुधारणा झाल्यामुळे हा निर्णय घेण्यात आला आहे. एलपीजी उत्पादन आणि आयात केलेल्या मालाची उपलब्धता सुधारल्यामुळे, एलपीजी पूलमधील C3-C4 प्रवाहांचे वळवणे कमी करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तथापि, देशांतर्गत एलपीजी उपलब्धतेवर परिणाम होणार नाही आणि एकूण उत्पादन दररोज किमान 40 टीएमटी राहील याची खात्री केली जाईल. तेल विपणन कंपन्यांना औद्योगिक आणि व्यावसायिक ग्राहकांचा सर्वसमावेशक डेटा ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत आणि राज्यांना सुधारित आराखड्याची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. सरकारने पीएनजीचा विस्तार करण्याच्या आणि पात्र ग्राहकांना टप्प्याटप्प्याने पीएनजीशी जोडण्याच्या आपल्या वचनबद्धतेचा पुनरुच्चार केला आहे. ■

# वैद्यकीय शिक्षण घेणारी आणि वैद्यकीय व्यवसाय करणारी पहिली भारतीय महिला

*महिला सक्षमीकरणाचे एक अद्वितीय प्रतीक असलेल्या डॉ. कादंबिनी गांगुली या कोलकाता विद्यापीठात प्रवेश घेणाऱ्या पहिल्या महिला होत्या. प्रबळ इच्छाशक्ती, समर्पण आणि वचनबद्धतेमुळे त्या केवळ भारतातीलच नव्हे, तर दक्षिण आशियातील पहिल्या महिला डॉक्टर ठरल्या. इतकेच नव्हे, तर त्यांनी कोळसा खाणींमध्ये काम करणाऱ्या महिलांचे जीवनमान सुधारण्यासाठीही व्यापक कार्य केले. एक यशस्वी डॉक्टर, स्वातंत्र्यसैनिक आणि प्रख्यात समाजसुधारक असलेल्या डॉ. कादंबिनी गांगुली या प्रतिकूल परिस्थितीतही चिकाटीने प्रयत्न करणाऱ्या लाखो महिलांसाठी एक प्रेरणास्थान आहेत.*



जन्मः 18 जुलै, 1861 ■ मृत्यू: 3 ऑक्टोबर 1923

स्वातंत्र्य लढ्यादरम्यान महिलांच्या शिक्षणाला चालना देण्यात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या कादंबिनी यांचा जन्म 18 जुलै 1861 रोजी भागलपूर येथे झाला. ज्या काळात मुलींना शिक्षण देण्याचा विचारही होत नसे, अशा काळात गांगुली यांना शाळेत दाखल करण्यात आले. त्यांनी या संधीचे सोने केले आणि 1883 मध्ये त्या ब्रिटिश भारतातून पदवीधर होणाऱ्या पहिल्या महिला ठरल्या. कादंबिनी यांनी भारतातील महिलांना घरातून बाहेर पडून, अर्थार्जन करून आत्मनिर्भर होण्यासाठी प्रेरणा दिली.

पदवी शिक्षणानंतर लगेचच, त्यांनी समाजसेवक आणि महिला सक्षमीकरण कार्यकर्ते प्राध्यापक द्वारकानाथ गांगुली यांच्याशी विवाह केला. द्वारकानाथ यांनी त्यांना वैद्यकीय पदवी घेण्यास प्रोत्साहन दिले. सर्व अडथळ्यांवर मात करून, कादंबिनी गांगुली यांनी आपल्या क्षेत्रात उल्लेखनीय यश मिळवले. सुरुवातीच्या काही अडचणींनंतर, त्यांनी अखेरीस कोलकाता मेडिकल कॉलेजमध्ये प्रवेश घेतला आणि 1886 मध्ये पुन्हा एकदा इतिहास घडवला.

त्यांनी वैद्यकीय पदवी मिळवली आणि त्या भारतात वैद्यकीय शिक्षण घेतलेल्या पहिल्या भारतीय महिला डॉक्टर बनल्या. त्यानंतर त्या परदेशात गेल्या आणि त्यांनी ग्लासगो व एडिनबर्ग विद्यापीठांमधून वैद्यकशास्त्रातील उच्चस्तरीय पदव्या मिळवल्या. त्यांनी ब्रिटनमध्ये काम करत करत शिक्षण घेतले आणि स्त्रीरोगशास्त्रात विशेष प्रावीण्य मिळवले. त्यांनी आणखी तीन प्रमाणपत्रेही मिळवली. त्यानंतर 1890 च्या दशकात त्या भारतात परतल्या आणि त्यांनी वैद्यकीय व्यवसाय सुरू केला.

कादंबिनी गांगुली वैद्यकीय व्यवसायाबरोबरच महिलांच्या हक्कांच्या मागणीत सक्रिय होत्या. त्यांनी 1889 मध्ये सहा जणींबरोबर भारतीय राष्ट्रीय काँग्रेसमध्ये पहिले महिला प्रतिनिधी मंडळ स्थापन केले. त्यांनी भारताच्या स्वातंत्र्य चळवळीत सक्रिय सहभाग घेतला. बंकिमचंद्र चटर्जी यांच्या कार्यामुळे त्यांच्या मनात देशभक्तीची भावना रुजली. एक डॉक्टर आणि आठ मुलांची आई म्हणून कादंबिनींचे व्यग्र जीवन त्यांना भारताच्या महिला हक्क चळवळीत भूमिका बजावण्यापासून रोखू शकले नाही.

ज्या काळात समाजात बालविवाह आणि सतीसारख्या प्रथा प्रचलित होत्या, त्या काळात कादंबिनी यांनी सातत्याने स्त्री स्वातंत्र्याचा पुरस्कार केला. त्यांनी सामाजिक सुधारणा चळवळींमध्ये सक्रिय सहभाग घेतला आणि इतर अनेक चळवळींमध्येही त्या खूप सक्रिय होत्या. त्यांनी कोळसा खाणीत काम करणाऱ्या महिला कामगारांसाठी काम केले. 1898 मध्ये त्यांच्या पतीचा मृत्यू झाला. त्यानंतर, अखेरपर्यंत त्यांनी कोलकाता येथे डॉक्टर म्हणून काम केले. 3 ऑक्टोबर 1923 रोजी त्यांचा देहांत झाला. ■



# 'प्रगती'
## ऊर्जा, उद्योग आणि वाहतूक क्षेत्राला मिळाली गती

*पायाभूत सुविधांना गती देणे, तंत्रज्ञानाच्या माध्यमातून लोककल्याणाला चालना देणे आणि एक सुरक्षित डिजिटल भारत घडवणे या वचनबद्धतेसह, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'प्रगती'च्या 52 व्या बैठकीचे अध्यक्षस्थान भूषवले. या बैठकीत 30,000 कोटी रुपयांच्या चार प्रमुख प्रकल्पांचा आढावा घेण्यात आला. आजपर्यंत, प्रगती व्यासपीठावर 85 लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या प्रकल्पांचा आढावा घेण्यात आला आहे. पीएम गतिशक्ती पोर्टल अद्ययावत ठेवणे, आरोग्यसेवा क्षेत्रात एआयचा वापर करणे आणि सायबर फसवणुकीविरोधात 'ई-झिरो एफआयआर' प्रणाली लागू करणे यावर बैठकीत लक्ष केंद्रित करण्यात आले.*

बैठकीदरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी चार वेगवेगळ्या राज्यांमध्ये विस्तारलेल्या चार प्रमुख पायाभूत सुविधा प्रकल्पांच्या प्रगतीचा आढावा घेतला. अंदाजे 30,000 कोटी रुपये एकत्रित खर्चाचे हे प्रकल्प रस्ते, वीज, औद्योगिक कॉरिडॉर आणि मेट्रो रेल्वे यांसारख्या क्षेत्रांशी संबंधित आहेत. हे प्रकल्प आर्थिक विकास, प्रादेशिक संपर्क, औद्योगिक प्रगती आणि सार्वजनिक कल्याणासाठी महत्त्वपूर्ण मानले जातात. या आढाव्यादरम्यान, विविध संस्थांमधील सुधारित समन्वय, मुदतीचे पालन आणि प्रत्यक्षातील समस्यांचे त्वरित निराकरण यावर विशेष लक्ष दिले गेले.

पंतप्रधान मोदी म्हणाले की, प्रकल्पांना होणाऱ्या विलंबामुळे केवळ बांधकामाचा खर्चच वाढत नाही, तर देशातील जनतेला आणि उद्योगधंद्यांना वेळेवर मिळणाऱ्या लाभांपासूनही वंचित राहावे लागते. या परिस्थितीला तोंड देण्यासाठी, त्यांनी संबंधित केंद्रीय मंत्रालये आणि राज्य सरकारांना सर्व प्रलंबित प्रश्न 'मिशन मोड'मध्ये सोडवण्याचे स्पष्ट निर्देश दिले.

### पीएम गतिशक्ती राष्ट्रीय मास्टर प्लॅनचा प्रभावी वापर
पंतप्रधानांनी 'पीएम गतिशक्ती राष्ट्रीय मास्टर प्लॅन'च्या वापरावर विशेष भर दिला. त्यांनी प्रकल्प, सुविधा, पायाभूत सुविधांचे स्तर, मान्यता आणि इतर क्षेत्रीय माहितीच्या तपशिलांसह पोर्टल नियमित तसेच वेळेवर अद्ययावत करण्याच्या गरजेवर जोर दिला.

### क्षयरोगमुक्त भारत मोहिमेत एआय तंत्रज्ञान
आरोग्य क्षेत्रात एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलत, पंतप्रधान मोदी यांनी 'टीबी मुक्त भारत अभियाना'च्या सद्यस्थितीचा आढावा घेतला. या रोगाचे निर्मूलन करण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेसह (AI) अत्याधुनिक डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर करण्यावर त्यांनी भर दिला. तसेच, एनसीसी कॅडेट्स आणि 'माय इंडिया' स्वयंसेवकांचा एक विशेष गट स्थापन करण्याची सूचनाही त्यांनी केली.

### सायबर फसवणुकीला आळा घालण्यासाठी स्पष्ट भूमिका
वर्तमान काळातील आव्हाने पाहता सायबर क्राईम आणि डिजिटल गुन्हेगारी यांच्याशी संबंधित तक्रारींची गांभीर्याने चर्चा केली गेली. डिजिटल व्यासपीठांच्या वाढत्या गैरवापराबाबत तीव्र चिंता व्यक्त करण्यात आली. अशा संवेदनशील प्रकरणांचा सर्व संबंधित सुरक्षा तसेच प्रशासकीय यंत्रणांनी समन्वित, संवेदनशील तसेच समयबद्ध पद्धतीने निपटारा केला पाहिजे, असे त्यांनी सांगितले.

सायबर फसवणुकाला लगाम घालण्यासाठी स्पष्ट उत्तरदायित्व असलेल्या, त्वरित प्रतिसाद आणि कायदा अंमलबजावणी संस्था, बँका व डिजिटल प्लॅटफॉर्म यांच्यात एक मजबूत समन्वय प्रणाली स्थापित करण्यात आली आहे. सायबर आर्थिक फसवणुकीच्या प्रकरणांची त्वरित नोंदणी आणि प्रतिसाद सुनिश्चित करण्यासाठी 'ई-झिरो एफआयआर' प्रणालीच्या अनिवार्य अंमलबजावणीला गती देण्याचे निर्देश सर्व राज्यांना देण्यात आले आहेत. ■



# राष्ट्र प्रथम

## भारताचा सर्वात मोठा मंत्र

*भारत ही केवळ वेगाने वाढणारीच नव्हे, तर एक विश्वासार्ह अर्थव्यवस्था देखील आहे. केंद्र सरकारच्या धोरणांमुळे भारतातील गुंतवणूकदारांचा आत्मविश्वास वाढला आहे, याचा महत्त्वपूर्ण सकारात्मक परिणाम होत आहे. याच संदर्भात, 'रिपब्लिक समिट 2026' मध्ये "महान शक्ती भारत: राष्ट्र प्रथम" या संकल्पनेवर एका चर्चेचे आयोजन करण्यात आले होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या परिषदेला संबोधित केले...*

राष्ट्र प्रथम ही भावना गेल्या दशकात भारताच्या यशाचा आणि एक विश्वसनीय शक्ती म्हणून त्याच्या उदयाचा पाया राहिली आहे. भारताचा उदय हा विश्वास, स्थिरता आणि व्यापक जागतिक हितावर आधारित आहे. म्हणूनच भारत केवळ एक वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था म्हणून उदयास येत नसून, तो एक विश्वसनीय आणि भरवशाचा भागीदार म्हणूनही उदयास आला आहे.

जी-7 शिखर परिषदेतील आपल्या सहभागाची आठवण करून देताना पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, जगभरातील नेत्यांना 'राष्ट्र प्रथम' या तत्त्वाप्रती असलेली भारताची वचनबद्धता माहीत आहे. सरकारच्या 12 वर्षांच्या कामाचा आढावा घेताना पंतप्रधान मोदी

## करमुक्त उत्पन्नाची मर्यादा वाढवली

मध्यमवर्गाच्या फायद्यासाठी आर्थिक सुधारणा लागू करण्यात आल्या. परिणामी, करमुक्त उत्पन्नाची मर्यादा वाढवण्यात आली, ज्यामुळे लोकांचे खर्च करण्यायोग्य उत्पन्न वाढले. तंत्रज्ञानावर आधारित ऑनलाइन फाइलिंग प्रणाली आणि चेहराविरहित मूल्यांकन यंत्रणा यांसारख्या सुधारणांनी करप्रणाली सुलभ केली आहे.

## विकास यात्रेने आशा वाढवली

भारताच्या विकास यात्रेने अपेक्षा वाढवल्या आहेत. या वातावरणामुळे लोक उत्तम पायाभूत सुविधा, जलद सेवा आणि चांगल्या जीवनमानाची अपेक्षा करत आहेत. या अपेक्षा देशाच्या भविष्यावरील विश्वासाचे सकारात्मक चिन्ह आहेत आणि प्रगती शक्य आहे या नागरिकांच्या विश्वासाचे द्योतक आहेत.

> *जीएसटी सुधारणेचा मध्यमवर्गालाही मोठा फायदा झाला आहे. कर भरणे खूप सोपे झाल्यामुळे वेळ आणि पैशांची बचत झाली आहे. घरबसल्या कर विवरण पत्र भरले जात आहेत आणि कोणत्याही समस्यांचे निराकरण आता "फेसलेस" पद्धतीने होत आहे.*
>
> **- नरेंद्र मोदी, पंतप्रधान**



## नवीन संधींचा लाभ

भारताचे तरुण, उद्योजक, नवप्रवर्तक तसेच स्टार्टअप्स झपाट्याने बदलणाऱ्या जागतिक वातावरणात नवीन संधी मिळवण्यात आघाडीवर आहेत. 'राष्ट्र प्रथम' या तत्त्वाचे पालन करत, सरकार सुधारणा, नवनिर्मिती आणि नागरिक-केंद्रित शासनासाठी कटिबद्ध आहे.

म्हणाले की, स्वच्छ भारत, 'मेक इन इंडिया', 'खादीला प्रोत्साहन' आणि 'स्थानिक उत्पादन मोहीम' यांसारखे प्रमुख राष्ट्रीय उपक्रम यशस्वी झाले, कारण नागरिकांनी 'राष्ट्र प्रथम' ही भावना स्वीकारली. एकेकाळी हिंसाचार आणि मागासलेपणाने ग्रासलेले प्रदेश आता विकासाचा अनुभव घेत आहेत. 'बस्तर ऑलिम्पिक्स'चे वाढते यश हे सिद्ध करते की, या प्रदेशात एकेकाळी असलेल्या भीती आणि अनिश्चिततेची जागा आता तरुणांच्या आशा आणि प्रतिभेने घेतली आहे.

देश निराशेच्या काळातून बाहेर पडून आत्मविश्वास आणि संधीच्या युगात प्रवेश करत आहे. 'बदल शक्य आहे' हा विश्वास भारताच्या सर्वात मोठ्या सामर्थ्यांपैकी एक बनला आहे. 'आकांक्षित जिल्हे' आणि 'आकांक्षित तालुके' या कार्यक्रमांनी देशातील काही अत्यंत मागासलेल्या भागांना विकासाचे इंजिन बनवले आहे. या प्रयत्नांनी लाखो नागरिकांचे राहणीमान सुधारण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. विकासाचे फायदे केवळ थेट लाभ मिळवणाऱ्यांपुरते मर्यादित नाहीत; ते संपूर्ण समाजाच्या समृद्धीमध्येही योगदान देतात. अलिकडच्या वर्षांत, सुमारे 25 कोटी लोक गरिबीतून बाहेर पडल्याने आणि एका मोठ्या नवीन मध्यमवर्गाच्या उदयामुळे आर्थिक घडामोडींना चालना मिळाली आहे.

बदलाच्या या प्रवासात केंद्र सरकार जनतेच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे. देश विकासाच्या मार्गावर वेगाने प्रगती करत आहे. येत्या काळात ही गती आणखी मजबूत होईल. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विश्वास व्यक्त केला की, 1.4 अब्ज भारतीयांचे सामूहिक प्रयत्न आणि आकांक्षा 'विकसित भारता'चे स्वप्न साकार करतील. ▪


पंतप्रधानांचा संपूर्ण कार्यक्रम पाहण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा.

नवीन राष्ट्रीय
शैक्षणिक धोरणाची
6 वर्षे

# युवा शक्ती

## विकसित भारताचा आधार






**श्रियः प्रदुग्धे विपदो रुणद्धि, यशांसि सूते मलिनं प्रमार्ष्टि।**
**संस्कारशौचेन परं पुनीते, शुद्धा हि बुद्धिः किल कामधेनुः॥**

याचा अर्थ शिक्षण हे केवळ उपजीविकेचे साधन नाही तर जीवनमान सुधारण्याचे एक समर्थ माध्यम देखील आहे. हा एक असा मौल्यवान ठेवा आहे, ज्याच्या माध्यमातून युवा शक्ती आज प्रत्येक क्षेत्रात नवनवीन विक्रम प्रस्थापित करुन देशाचे नाव उज्ज्वल करत आहे. याच दूरदृष्टीला संकल्पाचे रुप देऊन भारताच्या नवनिर्मितीच्या दिशेने वेगाने वाटचाल करणाऱ्या केंद्रसरकारने गेल्या 12 वर्षांमध्ये शिक्षणाबरोबरच कौशल्य विकास, उद्योजकता, क्रीडा, आरोग्य आणि सार्वजनिक सहभाग यांसारख्या क्षेत्रांमध्ये युवकेंद्रित उपक्रम सुरु केले आहेत. या प्रयत्नांची फलश्रुती म्हणून सहा वर्षांपूर्वी 29 जुलै रोजी सुमारे तीन दशकानंतर आलेल्या राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 मुळे शिक्षण सर्वांपर्यंत पोहोचवणे शक्य झाले, उच्च शिक्षणासाठी आवश्यक पायाभूत सेवासुविधांमध्ये वृद्धी झाली, कौशल्य विकास आणि रोजगाराच्या संधींमध्ये वाढ झाली. स्टार्ट अप, डिजिटल प्लॅटफॉर्म, समावेशक दृष्टिकोन आणि सहभागाच्या माध्यमातून युवावर्ग आता अमृत पिढीच्या रुपात विकसित भारताच्या संकल्प साकार करणारे सारथी बनले आहेत...

*भारताची जनता तरुण आहे, आणि भारताची मानसिकताही तरुण आहे. भारत आपल्या क्षमतेत तरुण आहे, आपल्या स्वप्नांमध्ये तरुण आहे. भारत आपल्या विचारांमध्ये तरुण आहे, आपल्या जाणिवेत तरुण आहे.*

या च वैशिष्ट्यांमुळे संपूर्ण जग आज भारताकडे आशा आणि विश्वासाने पाहत आहे. भारत तरुण आहे कारण भारताच्या दूरदृष्टीने नेहमीच आधुनिकता स्वीकारली आहे आणि भारताच्या तत्त्वज्ञानाने बदलाला आत्मसात केले आहे. लोकांपासून जगापर्यंतचा प्रवास असो किंवा सेवा आणि समर्पणाचा मार्ग, बदलाची दिशा असो किंवा शौर्य, सहकार्य किंवा सुधारणेचा परिचय, भारताच्या तरुणांनी स्वतःची एक नवी ओळख निर्माण केली आहे, कारण त्यांचा विश्वास 'करू शकतो' या भावनेवर आणि 'करून दाखवण्याच्या वृत्ती'वर आहे, आणि आता त्यांचे ध्येय गगनभरारी घेणे हे आहे. हाच दृष्टिकोन राष्ट्राला नवनवीन संधी प्रदान करत आहे. 29 जुलै 2020 रोजी देशासमोर आलेल्या नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचे मुख्य उद्दिष्ट भारताला ज्ञानाचे जागतिक केंद्र बनवणे हे आहे. यासोबतच, राष्ट्रीय युवा धोरणाच्या माध्यमातून युवकांना अमृत काळाकडे नेण्यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न केले जात आहेत. याअंतर्गत युवकांना आधुनिक कौशल्य आणि डिजिटल तंत्रज्ञानाशी जोडण्यात येत आहे तर दुसरीकडे देशात स्टार्टअप्स आणि युनिकॉर्न तयार करण्याच्या संस्कृतीला प्रोत्साहन दिले जात आहे. शिवाय, लष्करासह इतर क्षेत्रांमध्येही तरुणांसाठी नवीन संधी निर्माण होत आहेत. रोजगार आणि स्वयंरोजगाराशी संबंधित उपक्रम प्रत्यक्षात राबवले जात आहेत. खेळाला करिअरशी जोडून समाजाची मानसिकता बदलण्यासाठी एक मोठी मोहीम सुरू आहे. अमृत पिढी म्हणून ओळखली जाणारी युवाशक्ती, भारताच्या विकास प्रवासाची प्रेरक शक्ती बनली असून ती आत्मनिर्भर आणि विकसित राष्ट्राच्या संकल्पासोबतच अमृत काळात देशाला एका नवीन उंचीवर घेऊन जाईल. जर सरकारने सुधारणावादी पावले उचलली, तर तरुणच परिणाम घडवून आणतात. सरकार आणि तरुणांमधील ही भागीदारी राष्ट्राच्या निर्धाराला नवी चालना देत आहे.

## भारत बनत आहे शिक्षणाचे जागतिक केंद्र

एखादा देश त्यातील शिक्षण आणि शैक्षणिक धोरणांमुळे जगभरात

# शिक्षणाकडे पाहण्याचा बदललेला दृष्टिकोन...

## दर्जेदार शिक्षणाची खात्री करणे

गेल्या 12 वर्षांमध्ये केंद्र सरकारने शिक्षणासाठी आवश्यक पायाभूत सेवा सुविधा अधिक मजबूत केल्या असून त्यासोबतच तीन दशकांच्या कालखंडानंतर राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 ची अंमलबजावणी केली आहे. शिक्षणाचा पाया म्हणून, राष्ट्रीय शिक्षण धोरणानुसार शालेय शिक्षणाचे पूर्व-प्राथमिक ते वरिष्ठ माध्यमिक स्तरापर्यंत आधुनिकीकरण करण्यात आले आहे. राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 ची अंमलबजावणी टप्प्याटप्प्याने केली जात असून, त्याच्या स्थापनेला सहा वर्षे पूर्ण झाली आहेत आणि आता ते सातव्या वर्षात पदार्पण करत आहे...

### जगातील सर्वात मोठी शिक्षण प्रणाली

आणि उच्च शिक्षणाचे दुसरे सर्वात मोठे नेटवर्क

**24.69** कोटी विद्यार्थी

**14.71** लाख शाळा

**1.01** कोटींहून अधिक शिक्षक

उच्च शिक्षणामध्ये विद्यार्थ्यांची नोंदणी

| 2014-15 | 2025-26 |
|---|---|
| 3.42 कोटी | 4.5+ कोटी |

QS क्रमवारी 2026 च्या जागतिक क्रमवारीत चौथ्या क्रमांकावर.

- 1.49 लाखांहून अधिक शाळा आयसीटी आणि डिजिटल उपक्रमांच्या कक्षेत आणल्या.
- 1.76+ लाखांहून अधिक स्मार्ट वर्गखोल्यांना मंजुरी.
- 1.79 लाख आयसीटी प्रयोगशाळांना मंजुरी, 2025-26 पर्यंत.



# उच्च शिक्षा संस्थान तक पहुंच हुई आसान

| संस्था | 2014 | 2025 | वाढ (%) |
|---|---|---|---|
| आयआयटी | 16 | 23 | 44 |
| आयआयएम | 13 | 22 | 69 |
| एम्स | 7 | 23 | 228 |
| आयआयआयटी | 9 | 25 | 178 |
| IISER | 5 | 7 | 40 |
| विद्यापीठ | 760 | 1330 | 75 |
| महाविद्यालय | 38,500 | 52,000 | 35 |
| वैद्यकीय महाविद्यालय | 431 | 818 | 93 |
| एमबीबीएस जागा | 51,348 | 1,28,926 | 151 |
| वैद्यकीय पीजी जागा | 31,185 | 85,822 | 175 |



“

आज संपूर्ण जग हे मान्य करत आहे की भारताकडे दोन अमर्याद शक्ती आहेत — एक म्हणजे लोकसंख्येचा लाभ आणि दुसरी म्हणजे लोकशाही. ज्या देशाकडे जितकी मोठी युवा लोकसंख्या असते, त्या देशाचे सामर्थ्य तितकेच अधिक आणि त्याच्या प्रगतीच्या संधी तितक्याच व्यापक मानल्या जातात. मात्र, भारताच्या तरुणांकडे केवळ लोकसंख्याशास्त्रीय लाभांशच नाही, तर लोकशाही मूल्येही आहेत; त्यांचा लोकशाही लाभांश अतुलनीय आहे. भारत आपल्या तरुणांना विकासाचे प्रमुख चालक म्हणूनही मानतो.

**–नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

ओळखला जातो. केंद्र सरकारने जागतिक दर्जाचे शिक्षण निर्माण करून देशातील तरुणांना सक्षम केले आहे. सहा वर्षांपूर्वी पंतप्रधान मोदींनी एक नवीन, सुधारित राष्ट्रीय शिक्षण धोरण सादर केले, ज्यामुळे शिक्षण क्षेत्रात क्रांती घडली. आता इंग्रजी अनिवार्य राहिलेले नाही. केवळ शिक्षणाची उपलब्धताच नव्हे, तर दर्जेदार शिक्षण सुनिश्चित करणे ही आता केंद्र सरकारची वचनबद्धता बनली आहे. त्यामुळे, नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरणानुसार प्राथमिक आणि उच्च शिक्षण या दोन्ही स्तरांवर प्रादेशिक भाषांमध्ये अध्यापन करणे अनिवार्य करण्यात आले आहे. अभियांत्रिकी आणि माहिती तंत्रज्ञानासारखे तांत्रिक विषय आता पाच प्रादेशिक भाषांमध्ये शिकवले जाऊ शकतात. यामुळे केवळ प्रवेशसंख्या वाढणार नाही, तर विद्यार्थ्यांमध्ये जागतिक दृष्टीकोनासह स्थानिक समस्यांवर प्रभावी उपाय शोधण्याची क्षमता देखील विकसित होईल.

युवाशक्तीने समृद्ध असलेल्या प्रत्येक देशात तीन गोष्टी अत्यंत महत्त्वाच्या असतात आणि त्याच तरुणांची खरी ओळख घडवतात. पहिली गोष्ट म्हणजे नवकल्पना आणि अभिनव विचार. दुसरी म्हणजे धोका पत्करण्याची तयारी आणि धाडस, तिसरी म्हणजे करण्याची जिद्द—कोणतेही कार्य पूर्ण करण्याचा दृढनिश्चय.. परिस्थिती कितीही

## निवासी शाळांमुळे शिक्षण मिळवणे सोपे झाले...

- कस्तुरबा गांधी बालिका विद्यालये (KGBVs).
- नेताजी सुभाषचंद्र बोस निवासी शाळा (NSCBVs)
- पीएम-जनमन धरती आबा जनजाती ग्राम उत्कर्ष अभियान (DAJGUA) अंतर्गत आदिवासी समाजासाठी वसतिगृह सुविधा.

**499** एकलव्य मॉडेल निवासी शाळा

**1.56** लाख विद्यार्थ्यांची नोंदणी झाली




## तंत्रज्ञान आणि नवोन्मेष तरुणांना करत आहेत भविष्यासाठी सज्ज

**6** कोटींहून अधिक तरुणांना कौशल्य विकास उपक्रमांद्वारे प्रशिक्षण

**1.6** कोटींहून अधिक तरुणांना पंतप्रधान कौशल्य विकास योजनेअंतर्गत प्रशिक्षण

**2.19+** कोटी हून अधिक नोंदण्या मायभारत पोर्टलवर करण्यात आल्या

**1** कोटींहून अधिक विद्यार्थ्यांना अटल टिंकरिंग लॅबमध्ये प्रशिक्षण

- उदयोन्मुख तंत्रज्ञानामध्ये 16 लाखांहून अधिक प्रकल्प विकसित करण्यात आले.



- 6.4 कोटींहून अधिक लोकांना पीएमजीदिशा अंतर्गत प्रशिक्षण दिले आहे.
- 6.1 कोटींहून अधिक डिजिटल स्वयं प्लॅटफॉर्मवर नोंदणी, 18,580 अभ्यासक्रम आहेत उपलब्ध.
- 3.66 लाखांहून अधिक ई-सामग्री संसाधने दीक्षावर 135 भाषांमध्ये उपलब्ध आहेत.
- स्वयंप्रभा, पीएम ई-विद्या आणि दीक्षा यांनी दूरदर्शन, रेडिओ, डिजिटल सामग्री आणि ई-संसाधनांच्या माध्यमातून शिक्षणाच्या संधी अधिक वाढवल्या आहेत.
- 7,400 हून अधिक संस्थांनी 'वन नेशन वन सबस्क्रिप्शन' या उपक्रमाद्वारे उच्च शिक्षण स्तरावरील शैक्षणिक आणि संशोधन संसाधनांची उपलब्धता वाढवली आहे, ज्याचा लाभार्थी वर्ग जवळपास 1 कोटी आहे.

प्रतिकूल असली तरी या तिन्ही गुणांचा संगम झाला की, अभूतपूर्व यश आणि परिणाम साध्य होतात. या गुणांच्या जडणघडणीत शिक्षणाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे.

हीच कारणे आहेत की जवळपास तीन दशकांच्या प्रतीक्षेनंतर 29 जुलै 2020 रोजी भारताला नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरण प्राप्त झाले. हे धोरण भारताला ज्ञानाचे जागतिक केंद्र बनवण्याच्या दिशेने पुढे नेत आहे. याचा उद्देश शालेय आणि महाविद्यालयीन शिक्षणाला अधिक समग्र, लवचिक आणि 21 व्या शतकाच्या गरजांनुसार अनुकूल बनवून, भारताला एक चैतन्यशील ज्ञान समाज आणि जागतिक ज्ञान महासत्ता बनवण्यासाठी अद्वितीय क्षमता विकसित करणे हा आहे. व्यापक विचारमंथनातून तयार झालेले राष्ट्रीय शिक्षण धोरण वैज्ञानिक दृष्टिकोनावर आधारित असून विद्यार्थ्यांवर अभ्यासाचा अनावश्यक ताण येऊ नये हे सुनिश्चित करण्याच्या उद्देशाने तयार केले आहे. याच उद्देशाने, बोर्ड परीक्षांच्या पद्धतीत बदल करण्यात आले असून ग्रामीण भागांपर्यंत पोहोचण्यासाठी संशोधनाला अधिक महत्त्व देऊन ते अनिवार्य करण्यात आले आहे. एवढेच नाही तर, मनुष्यबळ विकास मंत्रालयाला आता शिक्षण मंत्रालय असेही म्हटले जाते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विद्यार्थीस्नेही धोरणांमुळे देशात मोठे बदल घडून आले आहेत. यामुळे एम्स, आयआयटी, आयआयएम आणि वैद्यकीय महाविद्यालयांच्या संख्येत विक्रमी वाढ झाली आहे.

आज भारत जगातील सर्वात मोठ्या शालेय शिक्षण व्यवस्थांपैकी एक आहे. देशात 14.71 लाख शाळा असून त्यामध्ये सुमारे 25 कोटी विद्यार्थी शिक्षण घेत आहेत आणि 1 कोटींहून अधिक शिक्षक अध्यापन करत आहेत. केंद्र सरकारने तरुणांसाठी उच्च शिक्षणाशी संबंधित मूलभूत पायाभूत सुविधांचा धोरणात्मक विस्तार केला आहे. शालेय तसेच उच्च

## राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP) 2020 मुळे शिक्षणात सुधारणा...
## शैक्षणिक प्रवास झाला अधिक प्रभावी आणि गुणवत्तापूर्ण

**170**
विद्यापीठांनी राष्ट्रीय क्रेडिट फ्रेमवर्क (NCRF) स्वीकारले आहे, ज्यामुळे विद्यार्थ्यांना क्रेडिट्स जमा करता येतात.

**2,469**
संस्था अकॅडमिक बँक ऑफ क्रेडिट्स (एबीसी) शी संलग्न, 32 कोटींहून अधिक विद्यार्थी ओळखपत्रे जारी करण्यात आली आहेत.

**15.48 कोटींहून** अधिक सत्यापित स्वयंचलित कायमस्वरूपी शैक्षणिक खाते नोंदणी म्हणजेच अपार आयडी 31 मार्च 2026 पर्यंत तयार करण्यात आले.

**153**
विद्यापीठे आता द्विवार्षिक प्रवेश आणि अनेक प्रवेश/निर्गमन संधी उपलब्ध करून देतात. वर्ष 2035 पर्यंत उच्च शिक्षणामध्ये 50 टक्के सकल नावनोंदणी गुणोत्तराचे लक्ष्य गाठण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल.



शिक्षणातील प्रवेशदरात लक्षणीय वाढ झाली आहे.

### पहिल्यांदाच सामान्य नागरिकांच्या सूचनांनुसार तयार झालेले धोरण...

स्वतंत्र भारतात 1968 मध्ये पहिल्यांदा राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची संकल्पना मांडण्यात आली. यामध्ये शिक्षण प्रणालीत परिवर्तन घडवून आणले गेले आणि 10+2+3 पद्धतीवर भर देण्यात आला. 1952 मध्ये लक्ष्मणस्वामी मुदलियार यांच्या अध्यक्षतेखाली माध्यमिक शिक्षण आयोगाची स्थापना करण्यात आली. त्यानंतर 1986 मध्ये लागू करण्यात आलेले नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 पर्यंत कायम राहिले. 1992 मध्ये 1986 च्या शैक्षणिक धोरणात काही दुरुस्त्याही करण्यात आल्या. त्यानंतर, टी.एस.आर. सुब्रमण्यम यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन करण्यात आली आणि मग जून 2017 मध्ये, इस्रोचे प्रमुख डॉ. के. कस्तुरीरंगन यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन करण्यात आली. या समितीने मे 2019 मध्ये 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा मसुदा' सादर केला. त्याला 29 जुलै 2020 रोजी मंजुरी देण्यात आली. राष्ट्रीय शिक्षण धोरणामध्ये 25 लाख ग्रामपंचायती, 6,600 तालुके आणि 676 जिल्ह्यांकडून आलेल्या जवळपास 2 लाख सूचनांचा समावेश आहे. सहभागी सल्लामसलत प्रक्रिया 2015 मध्ये सुरू झाली.

शिक्षण क्षेत्रात परिवर्तन घडवण्यासाठी तयार करण्यात आलेले नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, 21 व्या शतकातील महत्त्वपूर्ण आणि परिवर्तनकारी पाऊल ठरले आहे. याचाच परिणाम म्हणून, आज भारतातील तरुण पिढी देशासमोरील प्रत्येक आव्हानाला समर्थपणे सामोरे जात आहे. त्यावर प्रभावी उपाय शोधून ते आपल्या क्षमतेचा ठसा उमटवत आहेत. महान शिक्षणतज्ज्ञ आणि भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार




डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की, शिक्षण हे प्रत्येकाच्या आवाक्यातील आणि सर्वांसाठी सहज उपलब्ध असले पाहिजे.

हे शिक्षण धोरण त्यांच्या या विचारालाही समर्पित आहे. हे शिक्षण धोरण केवळ नोकरी शोधणारे नव्हे, तर नोकऱ्या निर्माण करणारे तरुण घडवण्यावर भर देते. म्हणजेच, एका अर्थाने विचारसरणी आणि दृष्टिकोनातच परिवर्तन घडवून आणण्याचा हा प्रयत्न आहे. शिक्षणासोबतच तरुणांना विविध क्षेत्रांत विशेष संधी उपलब्ध व्हाव्यात, यासाठीही केंद्र सरकारने गेल्या 12 वर्षांत सर्वसमावेशक दृष्टिकोनातून अनेक महत्त्वपूर्ण पावले उचलली आहेत.

### कौशल्य अभियानाच्या माध्यमातून नवा भारत कुशल बनत आहे

युवाओं युवकांना त्यांच्या शिक्षण, कौशल्ये आणि आकांक्षांनुसार रोजगार उपलब्ध करून देणे हे केंद्र सरकारचे प्राधान्य राहिले आहे. देशांतर्गत रोजगार कोणत्या प्रमाणात वाढत आहे, हे प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष निर्देशकांमधून दिसून येते. मजबूत आर्थिक धोरणांमुळे लाखो रोजगार निर्माण होत आहेत. प्रधानमंत्री कौशल्य योजनेअंतर्गत लोकांना कुशल बनवले जात आहे. केंद्र सरकारच्या या प्रयत्नांमुळे अनेक क्षेत्रांमध्ये रोजगाराच्या नवीन संधी निर्माण होत आहेत. देशात स्वयंरोजगाराच्या संधीही सातत्याने वाढत आहेत, ज्यातून केंद्र सरकारचा तरुणांवरील विश्वास दिसून येतो. तरुणांना भविष्यासाठी सक्षम बनवण्यासाठी त्यांना सातत्याने कौशल्यपूर्ण करणे, पुनःकौशल्य विकसित करणे आणि त्यांच्या कौशल्यांचा विकास करणे आवश्यक आहे. याच विचाराने भारतात कौशल्य मॅपिंगचे कार्य सुरू आहे. भारतातील तरुणांकडे विविध क्षेत्रांमध्ये काम करण्यासाठी आवश्यक

## खेलो इंडियामुळे घट्ट लागले आहे
# भारताचे क्रीडा भविष्य


- प्रशिक्षण, उपकरणे, क्रीडा, विज्ञान आणि आर्थिक पाठबळामुळे खेळाडूंच्या विकासाला बळकटी मिळाली आहे. क्रीडा क्षेत्र आता एक सन्मानजनक कारकिर्दीचे क्षेत्र म्हणून उदयाला येऊ लागले आहे. भारताचे ध्येय आता केवळ सहभाग घेणे नाही, तर जिंकणे हे आहे.
- 23.68 कोटींपेक्षा जास्त लोकांनी फिट इंडिया फ्रीडम रन, फिट इंडिया स्कूल वीक आणि फिट इंडिया क्विझमध्ये (प्रश्नमंजुषेत) सहभाग घेतला.

**4.5**
**लाखांपेक्षा जास्त शाळा फिट इंडिया स्कूल फ्लॅगने सन्मानित**

# जागतिक पटलावर
## फडकू लागला भारताचा ध्वज

**30,752**
**खेलो इंडिया अंतर्गत पाठबळ लाभलेले खेळाडू**

**आशियाई क्रीडास्पर्धांमध्ये विक्रमी पदके**
**107**





**पॅरिस पॅरालिम्पिकमध्ये**
**29**
**पदके**

**इम्फाळ – मणिपूरमध्ये 2018 मध्ये बनले भारताचे पहिले राष्ट्रीय क्रीडा विद्यापीठ**




कौशल्ये असणे अत्यंत गरजेचे आहे. यासाठी देशात उच्च शिक्षण संस्था, कौशल्य विकास संस्था युद्धपातळीवर उभारल्या जात आहेत. याचबरोबरीने 2014 ते 2026 या कालावधी दरम्यान दरवर्षी एक नवीन आयआयटी आणि एक नवीन आयआयएम उभारले गेले आहे. गेल्या 12 वर्षांमध्ये विद्यापीठे आणि महाविद्यालये सुरु होण्याची संख्या सातत्याने वाढली आहे. महाविद्यालये वाढल्यामुळे स्वाभाविकपणे प्रवेशाच्या जागांची संख्याही वाढली आहे, युवा वर्गासाठी उच्च शिक्षणाच्या संधी वाढल्या आहेत. कौशल्य विकासाच्या विविध योजनांतर्गत देशभरात 6 कोटींपेक्षा जास्त तरुण - तरुणींना कौशल्य प्रशिक्षण दिले गेले आहे.

### आता क्रीडा क्षेत्र बनले कारकिर्दीची नवीन ओळख

युवा वर्गाला प्रत्येक क्षेत्रात मिळत असलेल्या नवीन संधींच्या बळावर गेल्या 12 वर्षांत भारतीय क्रीडा क्षेत्राच्या एका नवीन युगाचा प्रारंभ झाला आहे. हे नवे युग भारताला केवळ एक मोठी क्रीडा शक्ती बनवण्यापुरते मर्यादित नाही, तर खेळांच्या माध्यमातून संपूर्ण समाजाला मजबूत आणि सक्षम बनवण्याची एक मोठी मोहीम आहे. एक काळ असा होता जेव्हा देशात क्रीडा क्षेत्राबाबत उदासीनतेची भावना होती. क्रीडा क्षेत्र हे देखील कारकीर्द घडवण्याचा एक पर्याय असू शकते, असा विचार फार कमी लोक करायचे. क्रीडा क्षेत्राला सरकारकडून जितकी मदत आणि सहकार्य मिळायला हवे होते, ते मिळत नव्हते हेच यामागचे कारण होते. त्यामुळेच गरीब, मध्यमवर्ग आणि ग्रामीण दुर्गम भागातील मुलांसाठी क्रीडा क्षेत्रातून स्वतःचा विकास साधणे खूप कठीण झाले होते. मुलांनी त्यांचे जीवन सुव्यवस्थित होईल अशा क्षेत्रात कारकीर्द घडवावी असेच बहुतांश पालकांनाही वाटू लागले होते. मात्र आता समाजाच्या दृष्टिकोनात

## प्रधानमंत्री मुद्रा योजना



**57.7 कोटी**
कर्जाच्या मंजूर अर्जांपैकी 40+ लाख कोटी रुपयांचा निधी या योजनेच्या प्रारंभापासून आतापर्यंत मंजूर

### कर्जाच्या संख्येत 28% वाढ

3.49 कोटी — 2015-16
4.49 कोटी — 2025-26

### कर्जाच्या रक्कमेत 312% वृद्धी

₹1.37 लाख कोटी — 2015-16
₹5.65 लाख कोटी — 2025-26

## रोजगाराच्या संधी जलद गतीने उपलब्ध




**12.5** लाखांपेक्षा जास्त नियुक्तीपत्रे

**19** रोजगार मेळ्यांच्या माध्यमातून प्रदान

- 3.5 कोटी नोकऱ्या निर्माण करण्यात मदत करण्याच्या उद्देशाने ऑगस्ट, 2025 मध्ये प्रधानमंत्री विकसित भारत रोजगार योजना सुरू करण्यात आली होती. या योजनेसाठी सरकार 1 लाख कोटी रुपये खर्च करणार आहे.
- 2025-26 मध्ये नॅशनल करिअर सर्विस पोर्टलवर 3.43 कोटींपेक्षा जास्त नोकऱ्या उपलब्ध करून देण्यात आल्या. हे पोर्टल डिजिटल रोजगार बाजारपेठ म्हणून कार्यरत आहे.



**1.5** लाख तरुण – तरुणींना अग्निवीर योजनेअंतर्गत सैन्यात भरती केले गेले आहे.

**भारताने जंझिबार आणि अबू धाबीमध्ये आयआयटीची दोन आंतरराष्ट्रीय संकुले सुरु केली आहेत. तर आयआयएम अहमदाबादने देखील दुबईमध्ये आपले संकुल सुरु केले आहे. 15 परदेशी विद्यापीठे भारतात आपली संकुले सुरु करतील अशी अपेक्षा आहे.**

मोठा बदल घडून आला आहे. जीवनात पुढे जाण्यासाठी क्रीडा क्षेत्राकडे एक पसंतीचे क्षेत्र म्हणून पाहिले जाऊ लागले आहे. या सगळ्यात खेलो इंडिया अभियानाने मोठी भूमिका बजावली आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रयत्नांमुळे देशभरातील लोकांच्या विचारांमध्ये बदल घडून आला आहे. केंद्र सरकारनेही क्रीडा क्षेत्रात कारकीर्द घडवण्याचे मार्ग प्रशस्त करू शकणारी धोरणे आखली. परिणामी टोकियो ऑलिम्पिकमध्ये भारताने 7 पदके जिंकून आतापर्यंतची सर्वोत्तम कामगिरी नोंदवली. पॅरिस ऑलिम्पिकमध्येही भारताने 6 पदके जिंकली. टोकियो पॅरालिम्पिकमध्येही भारताच्या खात्यात 19 पदके आली. याच प्रकारे पॅरिस पॅरालिम्पिकमध्येही भारताने 29 पदके जिंकली. नव्या भारताचा मंत्र आहे - सज्ज व्हा आणि जिंका. पॅरालिम्पिकमध्ये भारताने जितकी पदके जिंकली तितकी पदके भारताने आजवर इतिहासात जिंकलेली नव्हती. युवा वर्गात विजयाबद्दलचा विश्वास निर्माण झाल्यामुळे ऑलिम्पिकमध्येही भारताने सर्वोत्कृष्ट कामगिरी नोंदवली. केंद्र सरकारच्या 'टॉप्स' या कार्यक्रमाच्या माध्यमातून खेळाडूंना सहकार्य आणि प्रत्येक स्वरुपाच्या क्रीडा प्रकारांना प्रोत्साहन दिले जात आहे. आता राष्ट्रीय क्रीडा धोरण-2025 भारताला जागतिक क्रीडा महासत्ता

"

आज देशाचे ध्येय आहे- विकसित भारत, सशक्त भारत! आपल्याला विकसित भारताचे स्वप्न पूर्ण केल्याशिवाय थांबायचे नाही. मला विश्वास आहे, प्रत्येक युवा या स्वप्नाला स्वतःचे स्वप्न बनवेल, आपल्या खांद्यावर देशाची ही जबाबदारी घेईल.

**- नरेंद्र मोदी, पंतप्रधान**



बनवण्याच्या दिशेचा महत्त्वाचा उपक्रम ठरला आहे.

## स्टार्टअपपासून युनिकॉर्नपर्यंतची वाटचाल

गेल्या 12 वर्षांत नोकऱ्यांच्या स्वरूपातही खूप वेगाने बदल घडून आला आहे. बदलत्या परिस्थितीच्या काळात युवा वर्गासाठी नवीन क्षेत्रे उदयाला आली आहेत. केंद्र सरकार या नवीन क्षेत्रांनाही सातत्याने प्रोत्साहन देत आले आहे. या 12 वर्षांत देशाने स्टार्टअप संस्कृतीची नवीन क्रांती पाहिली आहे. 2014 मध्ये देशात स्टार्टअप्सची संख्या केवळ शेकडोमध्ये होती, तीच संख्या आज 2 लाखांच्या वर पोहोचली आहे. या स्टार्टअप्सनी किमान 21 लाख तरुण - तरुणींना रोजगार मिळवून दिला असल्याचा अंदाज आहे. या 12 वर्षांत ड्रोन क्षेत्रानेही नव्याने भरारी घेतली आहे. खतांच्या फवारणीपासून ते औषधांच्या पुरवठ्यापर्यंत ड्रोनचा वापर वाढतो आहे. गेल्या 12 वर्षांत केंद्र सरकारने मुद्रा योजनेअंतर्गत 57 कोटींपेक्षा जास्त कर्जांचे अर्ज मंजूर केले आहेत. जवळपास 12 कोटींपेक्षा जास्त लोक असे आहेत, ज्यांनी मुद्रा योजनेच्या मदतीने पहिल्यांदाच आपला स्वतंत्र उद्योग व्यवसाय सुरू केला आहे. पीएलआय योजनेअंतर्गत केंद्र सरकार उत्पादन क्षेत्रासाठी सुमारे 2 लाख कोटी रुपयांची मदत देत आहे. हा निधी भारताला जगाचे उत्पादन केंद्र बनवण्यासोबतच लाखोंच्या संख्येने युवा वर्गाला रोजगारातही मदतीचा ठरणार आहे.

## युवा वर्गातील उत्साहाला मिळत आहेत नवीन संधी

ज्या देशाचा युवा वर्ग उत्साह आणि स्फुर्तीने भारलेले असतील, त्या देशाचे प्राधान्य कायम युवा वर्ग हेच असेल. आजचा भारतही आपल्या सर्व युवा सहकाऱ्यांसाठी अशी व्यासपीठे उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करत आहे, जी देशाची स्वप्ने पूर्ण करण्यात उपयुक्त ठरू शकतील. भारताची डिजिटल क्रांती असो, भारताची स्टार्टअप क्रांती असो वा नवोन्मेष क्रांती असो, या सर्वांचा सर्वात मोठा लाभ युवा वर्गाला होत आहे. आज भारत ज्या प्रकारे आपल्या संरक्षण क्षेत्रात सातत्याने सुधारणा घडवून आणतो आहे, त्याचा लाभही देशाच्या युवा वर्गालाच होत आहे. एक असा काळ होता, ज्यावेळी असॉल्ट रायफल आणि बुलेट प्रुफ जॅकेट देखील परदेशातून आयात केले जायचे, मात्र आज लष्कराच्या गरजेच्या अशा शेकडो वस्तू आहेत, ज्या भारतातच बनू लागल्या आहेत. अशा सर्व अभियानांच्या माध्यमातून, भारताच्या युवा वर्गासाठी नवीन संधी निर्माण होऊ लागल्या आहेत. अलिकडेच देशाने अंतराळ क्षेत्राचे दरवाजे युवा प्रतिभेसाठी खुले केले. परिणामी पाहता पाहता पहिल्या खाजगी उपग्रहाचेही प्रक्षेपण झाले. याच प्रकारे ॲनिमेशन आणि गेमिंग क्षेत्र, प्रतिभावान युवा वर्गासाठी व्यापक संधी घेऊन आले आहे. मनोरंजन असो, रसद पुरवठा व्यवस्थापन क्षेत्र असो, अथवा शेती असो, प्रत्येक क्षेत्रात ड्रोन तंत्रज्ञानाचा वापर होऊ

लागला आहे.

गेल्या 12 वर्षांत पोलीस आणि निमलष्करी दलात मुलींच्या संख्येत जवळपास दुप्पटीने वाढ झाली आहे. तिन्ही सैन्य दलांमध्ये आघाडीच्या पदांवर महिलांच्या नियुक्तीचा मार्ग आता खुला झाला आहे. आज महिला भारतीय नौदलात पहिल्यांदा अग्निवीरच्या रूपात, नाविक म्हणून नियुक्त झाल्या आहेत. महिलांनी सशस्त्र दलात लढाऊ भूमिकांमध्येही स्थान मिळवण्यास सुरुवात केली आहे. केंद्र सरकारच्या वतीने सैनिक शाळांमध्ये मुलींच्या प्रवेशाला मंजुरीही दिली गेली आहे. याचाच परिणाम म्हणजे 28 मे ते 13 जून दरम्यान राष्ट्रीय संरक्षण अकादमीतून (एनडीए) प्रशिक्षित 17 महिला कॅडेट्सची पहिली तुकडी संरक्षण दलात अधिकारी म्हणून रुजु झाली आहे. ऑगस्ट 2022 मध्ये या कॅडेट्सनी एनडीएत प्रवेश घेतला होता. हे यश देशभरातील युवा महिलांच्या भावी पिढ्यांना लष्करात कारकीर्द घडवण्यासाठी तसेच राष्ट्र उभारणीत योगदान देण्यासाठी प्रेरणा देत राहील.

आज युवा वर्गासाठी स्व प्रमाणिकरणाची सुविधा उपलब्ध आहे. याउलट यापूर्वी युवावर्गाला कोणत्याही राजपत्रित अधिकाऱ्याकडून आपले प्रमाणपत्र प्रमाणित करून घ्यावे लागत होते. क आणि ड गटातील पदांच्या भरतीसाठी मुलाखती बंद करण्यात आल्या आहेत. तंत्रज्ञानाच्या या आजच्या युगात गावागावांमधील युवा वर्ग नवीन डिजिटल उद्योजक बनू लागला आहे. केंद्र सरकारच्या योजनांमुळे देशभरात रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या संधी सातत्याने वाढत आहेत. याव्यतिरिक्त केंद्र सरकारने युवा वर्गाला 10 लाख कायमस्वरूपी सरकारी नोकऱ्या देण्यासाठी रोजगार मेळ्यांचे आयोजनही सुरू केले. मात्र याची फलनिष्पत्ती पाहिली तर आतापर्यंत या मेळयांच्या माध्यमातून 12 लाखांपेक्षा जास्त नियुक्तीपत्रे प्रदान केली गेली आहेत. प्रधानमंत्री विकसित भारत रोजगार योजना यांसारखे उपक्रम आज आधारभूत उपक्रम बनले आहेत. एवढी मोठी युवा शक्ती जेव्हा राष्ट्र उभारणीच्या कार्यासाठी एकत्र येईल, त्यावेळी कोणतेही ध्येय असाध्य राहणारच नाही. अलीकडेच प्रस्तावित केलेल्या राष्ट्रीय युवा धोरण 2025 चा आराखड्याअंतर्गत भविष्यासाठी आवश्यक कौशल्य, उद्योजकता, नेतृत्व, नागरिकांचा सहभाग, डिजिटल

# युवा वर्गाला कौशल्य प्रशिक्षणाच्या संधी

2015 मध्ये कौशल्य भारत अभियानाचा प्रारंभ केला गेला होता. कौशल्य विकासाच्या व्यापक व्यवस्थेअंतर्गत कौशल्य, पुनर्कौशल्य आणि कौशल्य वृद्धीचे प्रशिक्षण दिले जाते. या अभियानाची आखणी अनेक स्तरांमध्ये विभागालेली आहे

- **प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना**
- **जन शिक्षण संस्थान**
- **नॅशनल अप्रेंटिसशिप प्रमोशन स्कीम**
- **औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत क्राफ्ट्समन ट्रेनिंग स्कीम**



**कृत्रिम बुद्धिमत्तेच्या सज्जतेसाठी कौशल्य विकासाअंतर्गत (SOAR) 2.31 लाख नोंदण्या करण्यात आल्या, हा 6वी ते 12वी च्या शालेय विद्यार्थ्यांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता विषयक मूलभूत कौशल्ये रुजवण्याचा अभ्यासक्रम आहे.**

**63**


हजारपेक्षा जास्त इंटर्नशिपच्या संधी प्रधानमंत्री इंटर्नशिप योजनेअंतर्गत उपलब्ध आहेत. युवा वर्गाला नियोजनबद्ध आणि सवेतन इंटर्नशिपच्या संधी देण्याच्या उद्देशाने ऑक्टोबर, 2024 मध्ये या उपक्रमाचा प्रारंभ केला गेला होता.

**3.45**

कोटींपेक्षा जास्त 18-28 या वयोगटातील तरुण - तरुणींचा औपचारिक मनुष्यबळात समावेश झाला आहे - ईपीएफओच्या आकडेवारीनुसार.








## राष्ट्रीय युवा धोरण...

राष्ट्रीय युवा धोरण (**NYP**) 2014 च्या माध्यमातून देशभरातील युवा वर्गाच्या विकासासाठी पायाभूत आराखडा तयार केला गेला आहे. या धोरणाअंतर्गत 15-29 वर्षे या वयोगटातील लोकांना युवा असे मानले गेले आहे. या धोरणाअंतर्गत शिक्षण, रोजगार, कौशल्य विकास, आरोग्य, क्रीडा, सामाजिक सहभाग आणि सक्षमीकरणाच्या क्षेत्रात सर्वसमावेशकता आणि संस्थात्मक सक्षमीकरणावर भर दिला गेला आहे.



सहभाग आणि शाश्वत विकास यांसारख्या प्राधान्याच्या उदयोन्मुख गरजांवर सर्वाधिक भर दिला गेला आहे.

खरे तर, कोणत्याही राष्ट्राचा गाडा हाकण्याण्यासाठी जी ऊर्जा सर्वात महत्त्वाची असते, ती ऊर्जा म्हणजे युवा वर्ग. वयाच्या या टप्प्यावर एक उत्साह आणि आवेष असतो. खूप मोठी स्वप्ने असतात आणि जेव्हा स्वप्ने संकल्प बनतात आणि संकल्प हेच जगण्याचे ध्येय बनते त्यावेळी आयुष्यही यशस्वी होते. भारताच्या युवा वर्गासाठी हा काळ नवीन संधींचा काळ आहे. सर्वत्र एकच चर्चा आहे की, आता भारताचे युग आले आहे, आज संपूर्ण जग

> "आज संपूर्ण जग भारताच्या युवा वर्गाकडे खूप मोठ्या विश्वासाने पाहत आहे. त्या विश्वासाचे कारण, हे भारताच्या युवा वर्गातील कौशल्य आणि संस्कार आहेत."
>
> **-नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

भारताकडे पाहत आहे. यामागील सर्वात मोठे कारण आहे ते भारताचा युवा वर्ग. खऱ्या अर्थाने युवा शक्ती भारताच्या विकासाच्या वाटचालीची प्रेरक शक्ती बनली आहे. अशावेळी ज्या राष्ट्राने सर्वसमावेशक प्रगतीचे ध्येय स्वतःसमोर ठेवले आहे, ते आपल्या युवा शक्तीच्या सर्वांगीण विकासात गुंतवणूक न करण्याचा धोका पत्करू शकत नाही.

भारत जगातील सर्वाधिक युवा शक्ती असलेला देश आहे. एवढी मोठी युवा शक्ती असलेला देश छोटी स्वप्ने पाहूच शकत नाही. म्हणूनच देशाच्या युवा वर्गाला मोठी स्वप्ने पाहता यावीत आणि ती पूर्णही करता यावीत यासाठी, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या संकल्पाला अनुसरून युवा वर्गाला मोठा विचार करण्याची संधी उपलब्ध होऊ लागली आहे. याच अनुषंगाने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकार युवा वर्गाच्या कल्याणासाठीच्या आपल्या धोरणांच्या माध्यमातून तसेच दूरदृष्टीने युवा वर्गातील क्षमता ओळखू लागले आहे आणि युवा वर्गाला त्यांची स्वप्ने पूर्ण करण्यासाठी संधी उपलब्ध करून देऊ लागले आहे.

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण असो वा कौशल्य विकास अभियान असो, स्टार्टअप क्रांती असो वा युवा वर्गाच्या स्वप्नांना पंखांचे बळ देणारी



केंद्रीय मंत्रिमंडळाचे निर्णय

# दिल्लीला सहा पदरी बोगदा उत्तर प्रदेशला नवीन महामार्ग




प्रतीकात्मक फोटो

*भक्कम दळणवळण आणि संपर्क व्यवस्था, तसेच दर्जेदार पायाभूत सुविधांमुळे प्रवास तर सुरळीत होतोच, सोबत व्यापारही वाढतो. त्यामुळे वेळेची बचत होते, इंधनाचा वापर कमी होतो आणि प्रदूषणातही घट होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी नेहमी सांगतात की, अशा पायाभूत सुविधांमुळे संपूर्ण प्रदेशात व्यापार, उद्योग, साठवणूक आणि मालवाहतूक -मालपुरवठा व्यवस्थेच्या नव्या संधी निर्माण होतात. याच अनुषंगाने 1 जुलै रोजी केंद्रीय मंत्रिमंडळाने दिल्ली आणि उत्तर प्रदेशसाठी 14,000 कोटी रुपयांपेक्षा जास्त निधीच्या दोन प्रकल्पांना मंजुरी दिली. या निर्णयामुळे दिल्लीला सहा पदरी रस्ते बोगदा मिळणार आहे, तर यूपीमध्ये तयार होईल, चार मार्गिकांचा ॲक्सेस कंट्रोल्ड ग्रीनफिल्ड नवीन हायवे (प्रवेश नियंत्रित नव्याने उभारलेला नवीन महामार्ग) ...*

**निर्णय :** राष्ट्रीय महामार्ग ( मूळ ) [एनएच ( ओ )] योजनेअंतर्गत, हायब्रिड ॲन्युइटी मोड ( एचएएम ) म्हणजेच सरकार आणि खासगी संयुक्त आर्थिक सहभाग, या पद्धतीने द्वारका एक्सप्रेसवे ( एनएच-248 बीबी ) या दिल्लीतील वसंत कुंज येथील नेल्सन मंडेला मार्गाशी जोडणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग-148 एईवरील सहापदरी रस्ते बोगद्याच्या बांधकामाला मंजुरी देण्यात आली आहे.

**परिणाम :** हा प्रकल्प 8.1 किमी लांबीचा असेल. त्याचा एकूण खर्च 6,969.67 कोटी रुपये आहे.

- यामुळे द्वारका द्रुतगती मार्गावरील शिवमूर्ती इंटरचेंज हा भाग, नेल्सन मंडेला मार्ग आणि वसंत कुंज परिसराशी थेट जोडला जाईल.
- पश्चिम आणि दक्षिण दिल्लीदरम्यान वेगवान दळणवळण व्यवस्था निर्माण होईल.
- धौला कुआं ते इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळ (आयजीआय एअरपोर्ट), छतरपूर - महिपालपूर ते आयजीआय विमानतळ आणि रंगपुरी येथील वाहतूक कोंडी कमी होईल.
- याशिवाय, गुरुग्राम, द्वारका, आयजीआय विमानतळ आणि पश्चिम दिल्लीकडून दक्षिण दिल्लीकडे जाणाऱ्या प्रवाशांनाही याचा फायदा होईल.
- भूमिगत दुहेरी बोगद्यामुळे वाहतुकीतील अडथळे मोठ्या प्रमाणात कमी होतील.
- सदर्न रिज वन (बोगद्याचा 1.98 किमी भाग या रिजच्या खालून जातो) सुरक्षित राहील.
- या प्रकल्पामुळे दररोज सुमारे 37,000 पॅसेंजर कार युनिट (पीसीयू) इतक्या वाहतुकीचा ताण कमी होण्यास मदत होईल.
- हा प्रकल्प पंतप्रधान गतिशक्ती उपक्रमांतर्गत निवड झालेल्या सहा आर्थिक केंद्रांना आणि चार मालवाहतूक केंद्रांना परस्पर जोडणी प्रदान करेल.
- असा अंदाज आहे की, राष्ट्रीय महामार्गाच्या प्रत्येक लेन-किलोमीटरच्या विकासामुळे सरासरी 264 मनुष्य-दिवसांचा थेट रोजगार आणि सरासरी 55 मनुष्य-दिवसांचा अप्रत्यक्ष रोजगार निर्माण होईल.



प्रतीकात्मक फोटो




**निर्णय :** उत्तर प्रदेशातील राष्ट्रीय महामार्ग-34 च्या कानपूर–कबरई मार्गावरील चार/सहापदरी प्रवेश-नियंत्रित टप्प्याच्या बांधकामाला बीओटी (टोल) पद्धती अंतर्गत 7,145.14 कोटी रुपयांच्या एकूण भांडवली खर्चासह मंजुरी देण्यात आली आहे.

**परिणाम :** हा चारपदरी प्रवेश-नियंत्रित टप्पा असून, भविष्यात तो सहापदरी करण्याची सुविधाही त्यामध्ये उपलब्ध आहे. हा भोपाळ–कानपूर आर्थिक पट्ट्याचा एक भाग आहे.

- हा प्रकल्प कानपूर आणि कबई दरम्यान विनाअडथळा, अति-वेगवान वाहतूक उपलब्ध करून देईल.
- सोबतच, हा प्रकल्प सागर, भोपाळ आणि मध्य प्रदेशातील इतर भागांशी पुढील संपर्क आणि दळणवळण व्यवस्था अधिक बळकट करेल. त्यामुळे उत्तर प्रदेशातील औद्योगिक आणि व्यापारी केंद्रांना मध्य प्रदेशातील खनिजसंपन्न तसेच कृषीप्रधान क्षेत्रांशी जोडणारी आधुनिक, प्रवेश-नियंत्रित आर्थिक मार्गिका विकसित होईल.
- हा प्रकल्प उत्तर प्रदेशमधील कानपूर, हमीरपूर आणि मध्य प्रदेशमधील आकांक्षी जिल्हा असलेल्या महोबाचा भाग सामावून घेईल.
- 80-100 किमी प्रति तास या वेगासाठी सुसंगत रचना केलेला हा पट्टा, कानपूर आणि कबई दरम्यानच्या प्रवासाचा वेळ साडेतीन तासांवरून दीड तासांपर्यंत, म्हणजेच सुमारे 58 टक्क्यांनी कमी होईल.
- याचसोबत रस्ते सुरक्षिततेत सुधारणा होईल, वाहन चालवण्यावरील खर्च कमी होईल आणि अधिक सुलभ आणि कार्यक्षम प्रवासी तसेच मालवाहतूक शक्य होईल.

**एनडीए 3.0 (राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारच्या तिसऱ्या कारकिर्दीत) मध्ये एकूण 26 लाख कोटी रुपयांच्या पायाभूत सुविधा विकास प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली आहे.**

- हा प्रकल्प पंतप्रधान गतिशक्ती उपक्रमांतर्गत निश्चित केलेल्या चार आर्थिक केंद्रांना आणि दहा मालपुरवठा वाहतूक केंद्रांना परस्पर जोडणी प्रदान करेल.
- या प्रकल्पाच्या बांधकामादरम्यान प्रत्येक लेन-किलोमीटरमागे सुमारे 11,188 मनुष्य-दिवसांचा थेट आणि 13,985 मनुष्य-दिवसांचा अप्रत्यक्ष रोजगार निर्माण होण्याची अपेक्षा आहे.




# भविष्यातील अर्थव्यवस्थेचे नेतृत्व करेल भारत

*विकसित भारताचा मार्ग तरुणाईच्या कौशल्यावर आणि सामर्थ्यावरच अवलंबून आहे. त्यामुळे तरुणाईच्या स्वप्नांना नवी भरारी देण्यासाठी केंद्र सरकार सातत्याने नव्या संधी उपलब्ध करून देत आहे. या उपक्रमांच्या मालिकेतील भाग म्हणून, पहिल्यांदाच नोकरी मिळवणाऱ्या तरुणांना प्रोत्साहन देण्यासाठी आणि त्यांना उद्योगांच्या गरजांशी सुसंगत संधी उपलब्ध करून देण्यासाठी 'प्रधानमंत्री विकसित भारत रोजगार योजना' सुरू करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 19 जून रोजी 2,400 कोटी रुपयांच्या प्रोत्साहन रकमेचे केले वितरण.....*

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे मत आहे की, 21 व्या शतकात कौशल्य, नावीन्यपूर्ण विचार आणि गुणवत्तेच्या बळावर वाटचाल करणारे देशच प्रगती करतील. त्यामुळे तरुणाईमध्ये ही वैशिष्ट्ये विकसित व्हावीत आणि त्यांच्या कौशल्याला योग्य दिशा मिळावी यासाठी केंद्र सरकार सातत्याने प्रयत्नशील आहे. तरुणांचा कौशल्य विकास करणे असो, त्यांच्या नावीन्यपूर्ण कल्पनांना जगभरात ओळख मिळवून देणे असो किंवा पहिल्यांदाच नोकरी देणाऱ्या उद्योगांना प्रोत्साहन देणे असो, सरकार प्रत्येक पातळीवर प्रयत्न करत आहे. याचे चांगले परिणाम आता केवळ देशातच नाही, तर संपूर्ण जगात दिसत आहेत. जगभरात भारताच्या तरुणाईला मागणी वाढली आहे. हे तरुण आपल्या कर्तृत्वाच्या बळावर केवळ देशाचे नाव उज्ज्वल करत नाहीत, तर परदेशात राहून भारताशी असलेले त्यांचे नातेही अधिक दृढ करत आहेत.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी प्रधानमंत्री विकसित भारत रोजगार योजनेचे (व्हीबीआरवाय) लाभार्थी, उद्योग जगताचे प्रतिनिधी आणि भागधारकांना सांगितले की, ही योजना भारत सरकारची, रोजगाराशी संबंधित मुख्य प्रोत्साहन योजना आहे. जग भारतीय तरुणाईच्या क्षमतेची दखल घेत आहे. प्रत्येक तरुणाला आपल्या क्षमतेचे यशात रूपांतर करण्याची संधी मिळावी, यासाठी सरकार कटिबद्ध आहे.

व्हीबीआरवाय ही केवळ एक रोजगार योजना नाही, तर त्याहूनही अधिक काही आहे. पहिल्यांदाच नोकरीला लागलेल्या तरुणांच्या आकांक्षांना बळ देण्यासाठी तसेच उद्योग आणि कर्मचारी वर्ग यांच्यात मजबूत दुवा निर्माण करण्यासाठी हा महत्त्वपूर्ण उपक्रम हाती घेण्यात आला आहे. जिथे अनेक योजना सामान्यतः कर्मचारी किंवा नियोक्त्यांवर केंद्रित असतात, तिथे हा कार्यक्रम एकाच वेळी दोघांना सहाय्य करतो आहे. आपल्या

*'प्रधानमंत्री विकसित भारत रोजगार योजना' ही केवळ रोजगार उपलब्ध करून देणारी योजना नाही, तर पहिली नोकरी मिळवणाऱ्या तरुणाईच्या स्वप्नांना नवी उभारी आणि बळ देणारी एक महत्त्वपूर्ण योजना आहे. ही, तरुणाई आणि उद्योग क्षेत्र यांच्यात भक्कम दुवा निर्माण करणारी योजना आहे.* **– नरेंद्र मोदी, पंतप्रधान**



पंतप्रधानांचा संपूर्ण कार्यक्रम पाहण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा.

## भारताच्या नवोन्मेष परिसंस्थेबाबत जगभरात वाढती उत्सुकता

गेल्या 10 वर्षांत भारतातील नवउद्योगांची संख्या सुमारे 500 वरून दोन लाखांहून अधिक झाली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सांगितले की, फ्रान्समध्ये झालेल्या 'इंडिया इनोव्हेट्स' कार्यक्रमाने भारतीय स्टार्टअप्स आणि जगभरातील गुंतवणूकदारांना एकत्र येण्याची संधी दिली आहे. येथे एआय (कृत्रिम बुद्धिमत्ता), अंतराळ तंत्रज्ञान (स्पेस टेक), पर्यावरणपूरक उर्जा (ग्रीन एनर्जी) आणि जैव तंत्रज्ञान (बायोटेक) यांसारख्या आधुनिक क्षेत्रांवर चर्चा झाली. अशा आयोजनांतून हे स्पष्ट होते की, जगाचा भारताच्या नवनवीन नवोन्मेषावरील विश्वास वाढत आहे. भविष्यातील तंत्रज्ञान घडवण्यात भारताची महत्त्वपूर्ण भूमिका असल्याचे जगही मान्य करत आहे.

## महिलांचा वाढता सहभाग

भारताच्या प्रगतीत आणि समाजाला पुढे नेण्यात महिलांचे योगदान वेगाने वाढले आहे. त्यांची सुरक्षा आणि सुविधा लक्षात घेऊन आता रात्रपाळीशी संबंधित नियमांमध्ये सुधारणा करण्यात आल्या आहेत. 'वर्क फ्रॉम होम'च्या संधी वाढवण्यात आल्या आहेत. यासोबतच, कार्यालयांमध्ये सुरक्षेचे उपाय अधिक बळकट करण्यात आले आहेत, जेणेकरून अधिकाधिक महिलांना कोणत्याही भीतीशिवाय सुरक्षित वातावरणात काम करता येईल.


## नवीन बाजारपेठांची दारे

भारतीय उद्योगांसाठी नवीन बाजारपेठा खुल्या होत आहेत. येथील व्यावसायिकांसाठी नवीन संधी उपलब्ध होत आहेत. संपूर्ण जग भविष्यातील अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने तयारी करत असताना, भारत त्या नव्या अर्थव्यवस्थेचे नेतृत्व करण्याच्या दिशेने वेगाने वाटचाल करत आहे. रोजगाराला सुरक्षितता, प्रतिष्ठा आणि सामाजिक संरक्षणाची जोड मिळावी, यावर सरकारने नेहमीच विशेष भर दिला आहे.

व्यावसायिक प्रवासाची सुरुवात करणाऱ्या तरुणांच्या पाठीशी, सरकार खंबीरपणे उभे आहे. त्याचबरोबर, नव्या रोजगाराच्या संधी निर्माण करणाऱ्या उद्योग आणि संस्थांनाही सरकार प्रोत्साहन देत आहे.

योजनेच्या यशाबाबत माहिती देताना पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, आतापर्यंत सुमारे 70 लाख नवीन रोजगार निर्माण झाले आहेत. तसेच, तेवढ्याच संख्येने पहिल्यांदाच नोकरी मिळालेल्या कर्मचाऱ्यांचा, सामाजिक सुरक्षा व्यवस्थेत समावेश करण्यात आला आहे. यापैकी सुमारे 20 लाख तरुणांनी आपल्या पहिल्या नोकरीत सहा महिन्यांचा टप्पा पूर्ण केला असून, त्यांपैकी सुमारे 10 लाख लाभार्थ्यांना या योजने अंतर्गत प्रोत्साहनपर रक्कम आधीच वितरित करण्यात आली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणतात, "सरकार, उद्योग आणि तरुण एकत्रितपणे कार्य करतात तेव्हा रोजगारनिर्मितीला नवी गती मिळते. हा उपक्रम अशा नव्या भारताचे चित्र उभे करतो, जिथे तरुणांना संधी मिळते, उद्योगांना प्रोत्साहन मिळते आणि रोजगारनिर्मिती हे राष्ट्रीय ध्येय बनते". ■

# बंगाल रचेल इतिहास... भारताचा वाढेल वेग



*भारत, 2047 वर्षा पर्यंत एक विकसित देश बनण्याच्या ध्येयावर काम करत आहे. विकसित भारताचे हे स्वप्न पूर्ण करण्याचे सर्वात मोठे माध्यम म्हणजे—पूर्व भारताचा विकास! यासाठी सरकार 'मिशन पूर्वोदय'वर काम करत आहे. यामध्ये बंगालची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. या मालिकेचा भाग म्हणून, पश्चिम वंग दिवस समारंभात सहभागी होण्यासाठी हुगळी येथे पोहोचलेल्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पीएम-किसानचा 23 वा हप्ता जारी केला. यासोबतच रेल्वे, कृषी, ग्रामीण विकास, मत्स्यपालन आणि पशुपालन क्षेत्राशी संबंधित विविध विकास प्रकल्पांचे केले भूमीपूजन आणि उद्घाटन....*

स्वातंत्र्यानंतर पश्चिम बंगालच्या उज्ज्वल भविष्यासाठी बंगालच्या महान विभूतींनी पाहिलेले स्वप्न आज, पश्चिम वंग दिवसाच्या निमित्ताने, प्रत्यक्षात साकार होताना देशवासीयांना प्रथमच अनुभवायला मिळत असल्याचे पंतप्रधानांनी सांगितले. तारकेश्वर येथे आयोजित समारंभात पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, पश्चिम वंग दिवसाच्या निमित्ताने इतिहासातील चुका पुन्हा कधीही होऊ न देण्याचा संकल्प करणे हे आपले कर्तव्य आहे. पश्चिम वंग दिवसाच्या प्रेरणेतून आता नव्या इतिहासाची निर्मिती केली जाईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

पश्चिम बंगालमध्ये औद्योगिक प्रगतीचा पाया पुन्हा रचला जाण्यास सुरुवात झाली

> *भारत 2047 पर्यंत विकसित देश बनण्याच्या ध्येयावर काम करत आहे. विकसित भारताच्या या संकल्पाचा सर्वात मोठा आधार म्हणजे—पूर्व भारताचा विकास! यासाठी आम्ही 'मिशन पूर्वोदय' वर काम करत आहोत. यात बंगालची भूमिका खूप मोठी आहे. बंगालच्या प्रगतीमुळे पूर्व भारताचा वेग वाढेल.*
>
> **– नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

## 'पश्चिम बंगाल : वारसा, सलोखा आणि विकास' ही होती संकल्पना

पश्चिम वंग दिवस समारंभाचा राज्यस्तरीय सोहळा हुगळीमधील तारकेश्वर येथे आयोजित करण्यात आला होता. तारकेश्वर हे डॉ. श्यामा प्रसाद मुखर्जी यांच्याशी निगडीत एक ऐतिहासिक महत्त्वाचे ठिकाण आहे. या वर्षीच्या पश्चिम वंग दिवसाची संकल्पनाः 'पश्चिम बंगालः वारसा, सलोखा आणि विकास'. ही संकल्पना राज्याची सांस्कृतिक समृद्धी, सामाजिक एकता आणि विकासात्मक आकांक्षा दर्शवते.

पंतप्रधानांचा संपूर्ण कार्यक्रम पाहण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा.

# केंद्र सरकारच्या योजनांचा लाभ आता पश्चिम बंगालला मिळायला सुरूवात

## पीएम पीक विमा योजनेचा शुभारंभ

- पश्चिम बंगालमध्ये प्रधानमंत्री पीक विमा योजनेचा (पीएमएफबीवाय) शुभारंभ करण्यात आला. यामुळे आता जगातील सर्वात मोठ्या पीक विमा योजनेचा लाभ, बंगालमधल्या शेतकऱ्यांना मिळू शकेल.
- पश्चिम बंगालमधल्या सुमारे 14 लाख हेक्टर कृषी भूमीवरच्या सुमारे 50 लाख शेतकऱ्यांना विमा संरक्षण देणे, हे 2026-27 या वर्षासाठीचे पीएमएफबीवाय योजनेचे उद्दिष्ट आहे.

सुमारे **28,140** कोटी रुपयांचा विमा उतरवलेल्या पिकांचे संरक्षण होऊ शकेल.

शेतकऱ्यांना पुरेशा प्रीमियम अनुदानाच्या माध्यमातून मदत केली जाऊ शकेल.

## पश्चिम बंगालमध्ये ॲग्रीस्टॅकचा शुभारंभ

- डिजिटल कृषी अभियानाअंतर्गत पश्चिम बंगालमध्ये ॲग्रीस्टॅकचा शुभारंभ करण्यात आला.
- या अंतर्गत खते वितरण, किसान क्रेडिट कार्ड, थेट लाभ हस्तांतरण आणि किमान हमी भावाने खरेदी, अशा कृषीविषयक सेवांसाठी एकीकृत डिजिटल प्लॅटफॉर्म उपलब्ध असेल.
- या उपक्रमामुळे कृषी क्षेत्रात डिजिटल व्यवस्था मजबूत होईल. शेतकरी-केंद्रीत सेवांचे कुशल वितरण अधिक सोपे होईल.

## राष्ट्रीय नैसर्गिक कृषी अभियानाचा शुभारंभ

- पश्चिम बंगालमधे शाश्वत, रसायनमुक्त शेतीला चालना देण्यासाठी, राष्ट्रीय नैसर्गिक कृषी अभियानाचा शुभारंभ.
- 2026-27 या वर्षासाठी स्वीकृत कार्य योजनेअंतर्गत राज्यात, 17,300 हेक्टरवर पसरलेल्या भूमीवर 346 नैसर्गिक कृषी समूह स्थापन केले जातील.
- जैव-इनपुट संसाधन केंद्रे बनवली जातील. पर्यावरण-अनुकूल कृषी पद्धतींना चालना देण्यासाठी कृषी सख्यांना सक्रिय केले जाईल.
- एकीकृत कृषी विकासाच्या दिशेने एक महत्वाचे पाऊल उचलत, पश्चिम बंगालमध्ये, प्रधानमंत्री धन-धान्य कृषी योजनेची (पीएमडीडीकेवाय) अंमलबजावणी देखील सुरु झाली.

## राज्याला विकास प्रकल्पांची भेट

- दक्षिण 24 परगणा या भागात, फ्रेजरगंज येथे आधुनिक आणि जास्त क्षमतेचे मासेमारी बंदर आणि बीरभूममधील सैंथिया येथे नवनिर्मित आधुनिक मत्स्यबाजाराचे उद्घाटन
- नादिया जिल्ह्यात हरिंगहाटा येथे बकऱ्यांसाठी स्थापन क्षेत्रीय वीर्य उत्पादन प्रयोगशाळा आणि वीर्य बँकेचेही उद्घाटन
- सुमारे 590 कोटी रुपये खर्चाच्या महत्वाच्या रेल्वे प्रकल्पांची पायाभरणी केली आणि काही प्रकल्पांचे राष्ट्रार्पण केले.
- हावड़ा येथे संकराइल-संतरागाछी लिंक लाइन प्रकल्पाचे राष्ट्रार्पण
- हावडा येथे 300 खाटांच्या क्षेत्रीय रेल्वे रुग्णालयाची पायाभरणी
- पूर्व मेदिनीपूर जिल्ह्यात हौर आणि राधामोहनपूर दरम्यानच्या नियोजित उड्डाणपूलाची पायाभरणीही केली.
- प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेअंतर्गत (पीएमजीएसवाय- 3) विकसित रस्तेविषयक 49 पायाभूत सुविधा प्रकल्पांचेही केले उद्घाटन.

## प्रधानमंत्री किसान सन्मान निधीचा 23 वा हप्ता वितरित

पश्चिम बंग दिवस समारंभात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते प्रधानमंत्री किसान सन्मान निधीचा 23 वा हप्ता शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्यात आला. या हप्त्याअंतर्गत, देशभरातील 9 कोटींपेक्षा जास्त शेतकऱ्यांच्या बँक खात्यात 18,880 कोटी रुपयांपेक्षा जास्त रक्कम हस्तांतरित करण्यात आली. एकट्या पश्चिम बंगालमध्येच 45 लाखांपेक्षा जास्त लाभार्थ्यांच्या खात्यात 900 कोटी रूपयांपेक्षा अधिक निधी जमा करण्यात आला आहे. ज्यामुळे राज्यात या योजनेअंतर्गत वितरित करण्यात आलेला एकूण निधी 15,000 कोटी रूपयांपेक्षा जास्त झाला आहे. 2019 साली या योजनेची सुरुवात झाल्यापासून वितरित करण्यात आलेला एकूण निधी, 4.46 लाख कोटी रूपयांपेक्षा जास्त झाला आहे. यामुळे, कोट्यवधी शेतकरी कुटुंबांना आर्थिक आधार मिळेल, आणि त्यांच्या आयुष्यात समृद्धी वाढेल, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटले आहे.




आहे. या पायाचे दोन अविभाज्य घटक आहेत—प्रामाणिक आणि पारदर्शक शासन ! आणि दुसरे- कायद्याचे राज्य ! पश्चिम बंगालच नाही, संपूर्ण देश आज या बदलांकडे बघत आहे. एका कार्यक्रमात पंतप्रधान मोदी म्हणाले की ज्या योजना मार्गातच अडकवून ठेवल्या, लटकवून ठेवल्या, आज ते सगळे अडथळे पार करत, लोककल्याणकारी शिबिरांच्या माध्यमातून, प्रत्येक सरकारी योजनेचा लाभ थेट आपल्यापर्यंत पोहोचवला जात आहे.



# पूर्व भारतात विकास आणि समृद्धी

## भारताचे प्रवेशद्वार म्हणून उदयाला येत आहे ओडिशा

*भारताच्या विकासासाठी पूर्व भारताचा विकास, या सरकारच्या धोरणामुळे या भागात विकासाच्या अनेक संधी खुल्या झाल्या आहेत. रेल्वेसंबंधी पायाभूत सुविधा, महामार्ग, आर्थिक मार्गिका, बंदरे, ऊर्जा, सेमी कंडक्टर, हरित ऊर्जा यासह आधुनिक उद्योगांमधे सरकार विक्रमी गुंतवणूक करत आहे. याच मालिकेत 20 जून रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विद्यमान ओडिशा सरकारला दोन वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने मयूरभंज येथे आयोजित कार्यक्रमात 47,000 कोटी रुपये खर्चाच्या विकास प्रकल्पाचे केले उद्घाटन आणि पायाभरणी...*

ओडिशा सरकारला दोन वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त आयोजित कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की गुंतवणूक, रोजगार आणि लोक-कल्याणकारी योजनांमुळे या राज्याचा झपाट्याने विकास होतो आहे आणि लोकांचे जीवनमान बदलत आहे. पंतप्रधानांनी यावेळी 47 हजार कोटी रुपये खर्चाच्या प्रकल्पांचे उद्घाटन आणि पायाभरणी केली, या प्रकल्पांमुळे नागरिकांसाठी दळणवळण आणि संपर्क व्यवस्था, सार्वजनिक सेवा, आर्थिक संधी आणि जीवनमानाची गुणवत्ता सुधारण्याची अपेक्षा आहे. पंतप्रधान मोदी म्हणाले की पहाडपूर गावाला सौर ग्राम म्हणून विकसित केले जाईल आणि प्रत्येक घरात सौर ऊर्जा निर्मिती सुनिश्चित केली जाईल.

ओडिशाच्या प्रसिद्ध कोणार्क सूर्य मंदिराचे उदाहरण देत, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सांगितले की पहाडपूरचे मॉडेल सौर ऊर्जा संचालित

> “ *आदिवासी समाजाच्या उत्थानासाठी आम्ही आदिवासी युवकांना शिक्षण आणि रोजगाराच्या संधीशी जोडतो आहोत. या मुलांना शिक्षणाच्या उत्तम सुविधा मिळाव्यात, यासाठी देशभरात सुमारे 500 एकलव्य मॉडेल शाळा उघडण्यात आल्या आहेत.*
>
> **– नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

पंतप्रधानांचा पूर्ण कार्यक्रम बघण्यासाठी QR कोड स्कॅन करा.



## महत्वाच्या प्रकल्पांची पायाभरणी

- 600 मेगावॅटचा अपर इंद्रावती पंप स्टोअरेज प्रकल्प.
- आय बी औष्णिक ऊर्जा केंद्राच्या दुसऱ्या टप्प्याच्या विस्ताराचा प्रकल्प, ज्यात 660 मेगावॅटच्या दोन एककांचा समावेश.
- झारसुगुडा जिल्ह्यात लखनपुर येथे भारत कोल गॅसीफिकेशन अँड केमिकल्स लिमिटेड प्रकल्प.
- नुआपड़ापासून घाटीपाड़ापर्यंतच्या राष्ट्रीय महामार्ग-353 च्या एका भागात रस्त्याचे चौपदरीकरण.
- कुसुमदिही मेगालिफ्ट सिंचन प्रकल्प.
- इग्नू क्षेत्रीय केंद्र आणि रायरांगपुर येथे इन-डोअर बॅडमिंटन संकुल.

## महत्वाच्या प्रकल्पांचे उद्घाटन

- बौध इथे 300 खाटांची क्षमता असलेल्या जिल्हा रुग्णालयाची इमारत.
- ओडिशाच्या विविध जिल्ह्यांत 24 अटल बस स्टँड आणि नऊ स्वयंचलित चाचणी केंद्रे.
- राष्ट्रीय महामार्ग-57 वर नयागढ़ टाउन बाह्यवळण रस्ता, कुसुमी स्मार्ट सिंचन प्रकल्प.
- रायरांगपुर येथे क्रीडा संकुल आणि आदिवासी संशोधन केंद्र

## आदिवासी समुदायाचा या योजनांमुळे होतो आहे विकास...

- ॲनिमिया आजाराविरोधात देशव्यापी अभियान
- जल जीवन अभियानामुळे सुरक्षित पेयजल झाले उपलब्ध

**500** सुमारे एकलव्य आदर्श निवासी शाळांची स्थापना

**750** एकलव्य शाळांना देण्यात आली मंजुरी

**1.5 कोटींपेक्षा** जास्त आदिवासी विद्यार्थ्यांना, मॅट्रिकपूर्व आणि मॅट्रिकोत्तर पातळीवर शिष्यवृत्ती

## राष्ट्रपती आणि पंतप्रधानांचा दौरा

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू अणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मयूरभंज जिल्ह्याच्या पहाडपूर गावाचा दौरा केला. राष्ट्रपती आणि पंतप्रधानांनी 'संथाली जाहेरा' आणि 'हो जाहेरा' या पवित्र तीर्थक्षेत्री पूजा-अर्चा केली. ओडिशा सरकारला दोन वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त आयोजित एका कार्यक्रमातही राष्ट्रपती आणि पंतप्रधान सहभागी झाले. या कार्यक्रमाची संकल्पना होती, 'विकास रा धारा, ओडिशा सारा' (संपूर्ण ओडिशामध्ये विकासाची गंगा). राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देत पंतप्रधान मोदी यांनी, राष्ट्रपतींचा मयूरभंजच्या मातीपासून ते देशाच्या सर्वोच्च संवैधानिक पदांपर्यंतचा प्रवास, ओडिशा आणि देशासाठी अत्यंत अभिमानास्पद असल्याच्या भावना व्यक्त केल्या.

गाव म्हणून साकार होईल. ओडिशाच्या स्रोतांचा उपयोग, सरकार विकास आणि समृद्धीच्या संधी शोधण्यासाठी करत आहे. त्यांनी उत्कर्ष ओडिशा सारख्या उपक्रमांचा उल्लेख केला. या उपक्रमाचा उद्देश, राज्यांत मोठ्या प्रमाणात गुंतवणूक आकर्षित करणे हा आहे, जेणेकरुन, संपूर्ण राज्यांत औद्योगिक विकासाला चालना मिळू शकेल.

या उपक्रमा अंतर्गत ओडिशाने आधीच सुमारे 20 लाख कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचे प्रस्ताव मंजूर केले आहेत, त्यासोबतच, अनेक मोठ्या प्रकल्पांचे काम सुरू झाले आहे, यांच्यासाठी सुमारे 3.5 लाख कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. ऊर्जा क्षेत्रात 6000 कोटी रुपयांपेक्षा जास्त गुंतवणूक केली जाते आहे. ■

12 व्या अंतरराष्ट्रीय योग दिनाचे आयोजन

# सर्वांना जोडणारा, सर्वांना एकत्र आणणारा योग



पंतप्रधानांचा योगदिनाचा संपूर्ण कार्यक्रम बघण्यासाठी QR कोड स्कॅन करा.



संसद भवन परिसरात लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला आणि इतर मान्यवर, 12 व्या आंतरराष्ट्रीय योगदिनी योगाभ्यास करताना

*भारताची हजारो वर्षांची योगपरंपरा आज संपूर्ण जगासाठी नव्या आशेचा किरण ठरली आहे. योगविद्या मानवजातीला निरोगी, संतुलित आणि शांततामय जीवनाचा मार्ग दाखवते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पुढाकारातून सुरू झालेला आंतरराष्ट्रीय योग दिन आज जागतिक लोकचळवळीचे स्वरूप धारण करून जगभर साजरा केला जात आहे. पश्चिम बंगालमधील कोलकाता इथल्या रेड रोडवर आयोजित 12व्या आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या राष्ट्रीय कार्यक्रमाचे नेतृत्व पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले. यावेळी ते म्हणाले की "योग सर्वांना जोडतो आणि सर्वांना एकत्र आणतो..*

भगवद्गीतेमध्ये भगवान श्रीकृष्णांनी योगाविषयी म्हटले आहे- युक्त आहार विहारस्य, युक्त चेष्टस्य कर्मसु। युक्त स्वप्न अव-बोधस्य, योगो भवति दुःखहा ॥ याचा अर्थ असा की संतुलित आहार-विहार, संतुलित कृती आणि कर्म, तसेच संतुलित झोप आणि जागरण यांमुळे योग हा दुःखांचा नाश करणारा ठरतो. हे संतुलनच योगविद्येचा पाया आहे, आणि हेच संतुलन आपल्या जीवनाचाही आधार आहे. मात्र, आजच्या आधुनिक युगात बहुतांश लोक जीवनात असंतुलन अनुभवत आहेत. त्यांना मोठी धडपड करावी लागत आहे. योगविद्या आपल्याला जीवन संतुलित पद्धतीने जगण्याची कला शिकवते. योग आपल्याला काय करावे आणि


## 12 व्या आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या राष्ट्रीय कार्यक्रमाचे पंतप्रधान मोदी यांनी केले नेतृत्व


- कोलकाताच्या रेड रोड वर 12 व्या आंतरराष्ट्रीय योग दिनाचा राष्ट्रीय समारंभ.
- योगाभ्यासींसोबत, कॉमन योग प्रोटोकॉल सत्रात पंतप्रधान मोदी झाले सहभागी.
- आंतरराष्ट्रीय योग दिन 2026 ची संकल्पना - निरोगी वृद्धत्वासाठी योग.
- ही संकल्पना वाढती आयुर्मर्यादा आणि निरोगी, सक्रिय तसेच सन्मानपूर्वक वृद्धत्व या विषयावर आधारित.
- 2015 साली आंतरराष्ट्रीय योग दिनाची स्थापना झाल्यानंतर, संयुक्त राष्ट्र महासभेने दरवर्षी 21 जून हा 'आंतरराष्ट्रीय योग दिन' म्हणून साजरा करण्याचा भारताचा प्रस्ताव स्वीकारला.

योग दिनानिमित्त जगभरात सुमारे **2,500** ठिकाणी आंतरराष्ट्रीय योग दिन कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमांमध्ये 210 पेक्षा जास्त भारतीय दूतावासांनी सहभाग नोंदवला.

- नवी दिल्ली, चंदीगड, लखनौ, म्हैसूर, न्यूयॉर्क (संयुक्त राष्ट्रांचे मुख्यालय), श्रीनगर आणि विशाखापट्टणम यांसह विविध ठिकाणी मुख्य कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.







राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, संरक्षणमंत्री राजनाथ सिंह आणि उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ योगाभ्यास करताना



उत्तराखंडमधील ऋषिकेश इथल्या पवित्र परमार्थ घाटावर योग करताना लोक

काय करू नये हे शिकवतो. तसेच, आपण आपल्या शरीराचा योग्य पद्धतीने वापर करायला शिकतो, तेव्हा आपण निरोगी राहतो.

पश्चिम बंगालमधल्या कोलकाता येथे आयोजित 12 व्या आंतरराष्ट्रीय योग दिवस कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सांगितले की, योग केवळ आपल्या शारीरिक आरोग्यावरच लक्ष केंद्रित करत नाही तर योग मानसिक स्वास्थ्यातून शारीरिक स्वास्थ्याचा मार्ग दर्शवतो. म्हणूनच योगाबाबत म्हटले आहे, "युक्त चेष्टस्य कर्मसु". म्हणजेच आपण काय करायला हवे,काय करू नये, याचा बोध. हा बोध आपल्या जीवनात शांतीचा स्रोत तर ठरतोच शिवाय यातून विश्वशांतीचा मार्गही प्रशस्त होतो. आंतरराष्ट्रीय योग दिवसाच्या निमित्ताने करोडो लोक योगाशी जोडले जातात.

*जेव्हा समाजाचे आरोग्य चांगले राहील, तेव्हा राष्ट्रही अधिक सक्षम, अधिक समृद्ध आणि आत्मविश्वासू होईल. मी तुम्हा सर्वांसाठी प्रार्थना करतो,"सर्वे भवन्तु सुखिनः, सर्वे सन्तु निरामयाः । यासोबतच तुम्हा सर्वांना आंतरराष्ट्रीय योग दिवसाच्या खूप खूप शुभेच्छा*

**- नरेंद्र मोदी, पंतप्रधान**



नवी दिल्लीस्थित हुमायूं मकबरा परिसरात योग करणारे लोक



भारतीय नौदलाने अनोख्या पद्धतीने पाण्याखाली केला योग



भारतीय नौदलाच्या 'सुदर्शनी नौकेने अमेरिकेच्या व्हर्जिनिया राज्यातील नॉरफॉकमध्ये 'टॉल शिप' वर योग सत्राचे आयोजन केले.



उपराष्ट्रपती सी.पी. राधाकृष्णन लेहमध्ये आंतरराष्ट्रीय योग दिवस कार्यक्रमात झाले सहभागी

आजचा हा दिवस आपल्या सामायिक संकल्पाचा पुनरुच्चार करण्याची संधी देतो, असे पंतप्रधान मोदी यांनी यावेळी सांगितले. चला, संकल्प घेऊया, योग केवळ एका दिवसापुरता, एका कार्यक्रमापुरता मर्यादित ठेवणार नाही, तर योग आपल्या जीवनाचा भाग बनवू, आपल्या कुटुंबाचा भाग बनवू, आपल्या येणाऱ्या पिढ्यांचा भाग बनवू. ■






# निष्ठा आणि समर्पणाला वंदन

*गेल्या काही वर्षात पद्म पुरस्कारांनी लुटियंस दिल्लीच्या वर्तुळातून बाहेर पडत भारताच्या दुर्गम गाव, जंगलांपर्यंत प्रवास केला आहे. आज पद्म पुरस्कार खऱ्या अर्थाने लोकांनी दिलेले सन्मान ठरत आहेत. प्रभाव, ओळखपाळख नव्हे तर सामाजिक उतरंडीवर पायथ्याशी असलेल्या व्यक्तीच्या जीवनात घडलेला बदल, हा या पुरस्कारांचा पाया बनला आहे. प्रतिभा आणि सेवाभाव ही कुठल्या विशिष्ट पार्श्वभूमीच्या अधीन नसतात, याचे प्रतीक पद्म पुरस्काराचे मानकरी आहेत. या लेखात देशाची मान अभिमानाने उंचावणाऱ्या देशाच्या नायकांच्या प्रेरककथा आहेत...*

राष्ट्रपति द्रौपदी मुर्मू यांनी 23 जून रोजी राष्ट्रपती भवन येथे आयोजित नागरी अलंकरण समारंभ II मध्ये वर्ष 2026 साठीचे पद्म विभूषण, पद्म भूषण आणि पद्मश्री पुरस्कार प्रदान केले. नागरी अलंकरण समारंभाच्या या दुसऱ्या टप्प्यात दोन पद्म विभूषण, 7 पद्म भूषण आणि 57 पद्मश्री पुरस्कार प्रदान करण्यात आले. केंद्र सरकारने यावर्षी 25 जानेवारीला एका संयुक्त पुरस्कारासह 131 पद्म पुरस्कार विजेत्यांच्या नावाची घोषणा केली होती. पद्म पुरस्कार प्रदान सोहळ्याचा पहिला टप्पा 25 मे 2026 रोजी झाला होता.

संपूर्ण कार्यक्रम पाहण्यासाठी QR कोड स्कॅन करा.



# पद्म विभूषण



## पी नारायणन

नारायणजी या नावाने लोकप्रिय पी नारायणन राष्ट्रवादी पत्रकारितेतील एक दिग्गज आणि एक महत्त्वाचे सामाजिक-राजकीय संघटक आहेत. नारायणजी यांनी केरळमध्ये एकेकाळी उपेक्षित असलेल्या विचारधारेला आवाज देण्यासाठी आपले जीवन समर्पित केले. केरळमधल्या थोडुपुझा इथल्या मानकडमध्ये 28 मे 1936 रोजी जन्मलेल्या नारायणन यांचे शिक्षण महात्मा गांधी महाविद्यालय आणि युनिव्हर्सिटी कॉलेज, तिरुवनंतपुरम येथे झाले. आरएसएसमध्ये दाखल झाल्यापासून विद्यार्थीदशेतच त्यांचा राजकीय प्रवास सुरू झाला. मुख्यत्वेकरून केरळच्या उत्तर आणि मध्य भागात प्रचारक म्हणून सेवेसाठी त्यांनी आपले जीवन वाहून घेतले. पत्रकारितेसोबतच नारायणन यांनी एक विद्वान लेखक आणि एक कुशल अनुवादक म्हणूनही योगदान दिले आहे.

## न्यायमूर्ती (सेवानिवृत्त) के. टी. थॉमस

न्यायमूर्ती (सेवानिवृत्त) के.टी. थॉमस सर्वोच्च न्यायालयाचे सेवानिवृत्त न्यायाधीश आहेत. 30 जानेवारी 1937रोजी जन्मलेल्या थॉमस यांनी सी.एम. एस कॉलेज, कोट्टायम इथून महाविद्यालयीन शिक्षण घेतले. त्यांना 1985 मध्ये केरळ उच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून नियुक्त करण्यात आले. त्यांना 1995 मध्ये केरळ उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश (प्रभारी) म्हणून नेमण्यात आले. मार्च 1996 मध्ये सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून त्यांची नियुक्ती करण्यात आली. वर्ष 2002 मध्ये ते सर्वोच्च न्यायालयातून सेवानिवृत्त झाले. फौजदारी कायदा, पोलीस सुधारणा आणि खासगी व्यावसायिक शिक्षणातील भ्रष्टाचारविरोधातील लढ्यातील योगदानासाठी ते ओळखले जातात. थॉमस यांना 2007 मध्ये पद्म भूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते.





# पद्म भूषण



## डॉ. विजय अमृतराज

डॉ. विजय अमृतराज देशातील महान टेनिस खेळाडूंपैकी एक आहेत. चेन्नई येथे 14 डिसेंबर 1953 रोजी जन्मलेल्या डॉ. विजय यांनी 14 व्या वर्षीच कनिष्ठ गट स्पर्धांमध्ये भारताचे प्रतिनिधीत्व करण्यास सुरुवात केली. त्यांनी आपल्या कारकिर्दीत अनेक शानदार विजय मिळवले. भारतीय क्रीडा जगतातील ते एक प्रतिष्ठित व्यक्तिमत्त्व असून त्यांचे कार्य आणि योगदानासाठी वर्ष 1983 मध्ये भारत सरकारद्वारे त्यांना पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्यांना इंटरनॅशनल टेनिस हॉल ऑफ फेम आणि आंतरराष्ट्रीय टेनिस महासंघाचा सर्वोच्च सन्मान गोल्डन अचिव्हमेंट अवॉर्डने सन्मानित करण्यात आले आहे. आजही विविध मंचावर ते आपले विचार मांडत असतात आणि त्यांनी कायम उराशी बाळगलेल्या मूल्यांचा, भारताचा गौरव, अखंडता आणि निष्ठा यांचा सातत्याने प्रसार करत असतात.

## डॉ. एस. के. एम मलियानंदन

एसकेएम कंपनी समूहाचे कार्यकारी अध्यक्ष डॉ. एस. के. एम मलियानंदन एक प्रसिद्ध उद्योगपती असण्यासोबतच वेगवेगळ्या सामाजिक कल्याण न्यासांचे संस्थापक आणि एक ग्राहक कार्यकर्ता आहेत. ते त्यांच्या निःस्वार्थ सेवेसाठी आणि योग व ध्यान यांच्या प्रसारासाठी जगभरात ओळखले जातात. तामिनाडूतल्या इरोड जिल्ह्यात 18 मे 1945 रोजी जन्मलेले डॉ. मलियानंदन केवळ शालेय शिक्षण घेऊ शकले. मात्र त्यांनी ग्रामीण क्षेत्रात शिक्षित आणि अशिक्षित लोकांच्या स्वयंरोजगाराचा विडा उचलला आणि संपूर्ण वर्ष त्यांना नोकरीची संधी पुरवली. त्यांनी बाजार आणि मूल्य निर्धारणातील शेतकऱ्यांच्या समस्यांचे अध्ययन, विश्लेषण आणि कोंबड्यांच्या आजारांना प्रतिबंध यांविषयींच्या अनेक चर्चा, बैठकांचे आयोजन केले. वर्ष 2013 मध्ये सामाजिक कार्यासाठी त्यांना पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.





# पद्म भूषण



## मामूट्टी

मोहम्मद कुट्टी पन्नापराम्बिल इस्माईल उर्फ मामूट्टी हे भारतीय चित्रपट अभिनेते आणि निर्माते आहेत. ते दक्षिण भारतीय भाषांच्या चित्रपटांमध्ये, त्यातही प्रामुख्याने मल्याळम चित्रपटसृष्टीत कार्यरत आहेत. मामूट्टी यांचा जन्म 7 सप्टेंबर, 1951 रोजी झाला. त्यांचे वडील शेतकरी होते आणि त्यांची मुळे शेती व ग्रामीण जीवनात घट्ट रुजलेली होती. पाच दशकांच्या कारकिर्दीत मामूट्टी यांनी 400 हून अधिक चित्रपटांमध्ये अभिनय केला आहे. त्यामध्ये प्रामुख्याने मल्याळम चित्रपटांसह अनेक तमिळ, तेलुगू, कन्नड, हिंदी आणि इंग्रजी चित्रपटांचाही समावेश आहे. त्यांना भारतीय चित्रपटसृष्टीतील सर्वोत्तम अभिनेत्यांपैकी एक मानले जाते. चित्रपटसृष्टीतील योगदानाव्यतिरिक्त त्यांचे मानवतावादी उपक्रम आणि सामुदायिक विकासामध्ये सक्रिय योगदान आहे. चित्रपट आणि कलेतील योगदानाबद्दल त्यांना वर्ष 1998 मध्ये पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

## वेल्लापल्ली नटेशन

वेल्लापल्ली नटेशन हे केरळमधील एक मुख्य सामाजिक नेते आणि प्रतिष्ठित व्यक्तिमत्त्व आहेत. ते श्री नारायण धर्म परिपालन (एसएनडीपी) योगमचे महासचिव तसेच श्री नारायण ट्रस्टचे सचिव आहेत. नटेशन यांचा जन्म 10 सप्टेंबर, 1937 रोजी केरळमधील अलप्पुझा जिल्ह्यातील कनिचिकुलंगरा इथे झाला. मागासवर्गीयांच्या सामाजिक आणि शैक्षणिक उन्नतीसाठी ते कटिबद्ध राहिले आणि प्रमुख नेते म्हणून उदयास आले. वर्ष 1903 मध्ये श्री नारायण गुरु यांनी स्थापन केलेल्या एसएनडीपी योगम चळवळीला त्यांनी नवी ऊर्जा दिली. त्यांच्या नेतृत्वाखाली वर्ष 1996 नंतर संघटनेची व्याप्ती तळागाळापर्यंत पोहोचली आणि ती एक आधुनिक सामाजिक-आर्थिक चळवळ म्हणून विकसित झाली. त्यांच्या नेतृत्वाखाली शाखांची संख्या 3,000 वरून वाढून 6,000 पेक्षा अधिक झाली. नटेशन यांनी शाखा स्तरावर कुटुंब एककांचीही सुरुवात केली आणि संघटना घरोघरी पोहोचविली.



पद्म भूषण



## डॉ. दत्तात्रेयुडु नोरी

डॉ. दत्तात्रेयुडु नोरी हे आंतरराष्ट्रीय स्तरावरील ख्यातनाम कर्करोगतज्ज्ञ, अग्रगण्य चिकीत्सक आणि एक महत्त्वाचे बुद्धिजीवी व्यक्तिमत्त्व आहे. चार दशकांहून अधिक काळाच्या कारकिर्दीत त्यांनी न्यूयॉर्क इथल्या जागतिक कीर्तीच्या कॉर्नेल मेडिकल सेंटरमध्ये कर्करोग अभ्यास विभागात प्राध्यापक, अध्यक्ष आणि कर्करोग केंद्राचे संचालक म्हणून काम केले आहे. कर्करोगावरील अनेक उपचार तंत्रांच्या विकासातील अग्रणी म्हणून त्यांची मोठी ओळख आहे. त्यांच्या योगदानामुळे उपचारांच्या दरात लक्षणीय सुधारणा झाली आणि जागतिक स्तरावर अनेक रुग्णांचे जीव वाचविण्यास मदत झाली. डॉ. नोरी यांचा जन्म 18 ऑक्टोबर 1947 रोजी झाला. विविध सरकारे आणि खासगी संस्थांसोबत सहकार्य करून त्यांनी कर्करोग केंद्रांच्या स्थापनेसाठी आपल्या ज्ञानाचे योगदान दिले. वैद्यकीय क्षेत्रातील योगदानाबद्दल भारत सरकारने त्यांना वर्ष 2015 मध्ये पद्मश्री पुरस्काराने सन्मानित केले.

## शिबू सोरेन (मरणोत्तर)

आदरपूर्वक "दिशोम गुरु" म्हणून ओळखले जाणारे शिबू सोरेन हे भारतातील प्रमुख आदिवासी लोकनेता, समाजसुधारक आणि झारखंड आंदोलनाच्या मुख्य शिल्पकारांपैकी एक होते. आदिवासी समाजाच्या सन्मान, ओळख, न्याय आणि स्वशासनाशी संबंधित दीर्घकालीन आकांक्षांचे ते एक सुदृढ, नैतिक आणि राजकीय प्रवक्ते होते. त्यांचे संपूर्ण जीवन जल, जंगल आणि जमीन यांच्या नैतिक संरक्षणाच्या तत्त्वाचे प्रतीक ठरले. झारखंडमधील रामगड जिल्ह्यातील नेमरा गावात 11 जानेवारी 1944 रोजी सोरेन यांचा जन्म झाला. एका सामान्य संथाल आदिवासी कुटुंबात जन्माला आलेल्या सोरेन यांनी तीन वेळा झारखंडचे मुख्यमंत्री, तसेच केंद्रीय कोळसा मंत्री म्हणून काम केले. सोरेन हे केवळ एक राजकारणी नव्हते तर; लाखो लोकांसाठी ते स्मृती, प्रतिकार आणि आशेचे संरक्षक होते. त्यांनी आदिवासी हक्क, सामाजिक न्याय, लोकशाही मूल्ये आणि नैसर्गिक साधनसंपत्तीवरील स्थानिक समुदायांच्या अधिकारांसाठी सातत्याने आवाज उठविला. शिबू सोरेन यांचे 4 ऑगस्ट 2025 रोजी निधन झाले.





## अलका याज्ञिक

अलका याज्ञिक या प्रसिद्ध भारतीय पार्श्वगायिका आहेत. चार दशकांहून अधिक गायन प्रवासात त्यांच्या मधुर आवाजाने, कलात्मक उत्कृष्टतेने आणि अखंड समर्पणाने भारतीय चित्रपटसृष्टी आणि सांस्कृतिक वारसा समृद्ध केला आहे. कोलकाता इथे 20 मार्च, 1960 रोजी अलका याज्ञिक यांचा जन्म झाला. त्यांनी आपली आई शुभा याज्ञिक यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय शास्त्रीय संगीताचे प्राथमिक शिक्षण घेतले. शास्त्रीय संगीताच्या भक्कम पायावर आपल्या संगीत प्रवासाची सुरुवात केली, त्यांच्या वैशिष्ट्यपूर्ण कलात्मक संवेदनशीलतेला आणि मधुर गायकीला आकार आला. याज्ञिक या यूट्यूबवरील आजपर्यंतच्या सर्वाधिक लोकप्रिय संगीत कलाकार आहेत. भारतीय संगीत क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानासाठी त्यांना अनेक प्रतिष्ठित सन्मान आणि पुरस्कार मिळाले आहेत. अनेक दशकांपासून सातत्यपूर्ण कलात्मक कामगिरी आणि अखंड लोकप्रियता ही त्यांच्या असामान्य प्रतिभेची आणि कलेप्रती असलेल्या अढळ निष्ठेची साक्ष ठरली आहे.




# भारत
# ग्लोबल साउथमधील देशांच्या आकांक्षा आणि अपेक्षांचा सशक्त आवाज

*सरकारच्या धोरणांनी आणि दूरदर्शी नेतृत्वाने जगभरात भारताचा मान उंचावला आहे. आज भारत केवळ स्वतःचाच नव्हे तरच 'ग्लोबल साउथ'च्या आशाआकांक्षा आणि गरजांचा प्रभावशाली आवाज ठरला आहे. भारताला सलग आठव्यांदा जी-7 शिखर परिषदेसाठी निमंत्रण मिळाले, हा भारताची जगातील वाढती ताकद आणि विश्वासार्हता याचा पुरावा आहे. याच अनुषंगाने पंतप्रधान नरेंद्र मोदी 13 ते 18 जून दरम्यान फ्रान्स आणि स्लोव्हाकिया या देशांच्या दौऱ्यावर होते. या काळात त्यांनी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यासह अनेक जागतिक नेत्यांची भेट घेतली. परस्पर सहकार्याबरोबरच जगासमोरील महत्त्वाच्या मुद्द्यांवर सविस्तर चर्चा केली.*

जागतिक संबंधांच्या बळकटीकरणासाठी आणि जगासमोर उभ्या ठाकलेल्या आव्हानांवर चर्चा करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी 13 ते 18 जून या काळात फ्रान्स आणि स्लोव्हाकिया देशांच्या दौऱ्यावर होते. तिथे ते जी-7 शिखर परिषदेत सहभागी झाले आणि अनेक जागतिक नेत्यांशी द्विपक्षीय चर्चा केली. या दौऱ्यात पंतप्रधान मोदी विवाटेक् संमेलनातही सहभागी झाले. हे युरोपातील तंत्रज्ञान आणि नवोन्मेषासंदर्भातील सर्वात मोठे संमेलन होते. या संमेलनात भारताचा आतापर्यंतचा सर्वात मोठा राष्ट्रीय पॅव्हेलियन उभारण्यात आला होता. याशिवाय पंतप्रधान मोदी आणि राष्ट्राध्यक्ष मॅक्रोन हे 'भारत इनोव्हेट्स' या कार्यक्रमात सहभागी झाले. पंतप्रधान मोदी यांनी पॅरिसमधील भारतीय समुदायाचीही भेट घेतली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'सब का साथ, सब का विकास,

> *जी-7 चे भांडवल, भारताची प्रतिभा आणि ग्लोबल साउथमधील देशांचे स्वामित्व यांना एकत्र आणत आपल्याला इम्पॅक्ट अर्थात 'इंटरनॅशनल मोबिलायझेशन पार्टनरशिप फॉर ॲक्सेलरेटिंग कनेक्टिव्हिटी अँड ट्रेड' स्थापन करण्याचा विचार करता येईल. याचा उद्देश व्यापार, तंत्रज्ञान, ऊर्जा आणि संधी यांना परस्पर जोडतील अशा संपर्काच्या सुविधा निर्माण करणे असायला हवा.*
>
> **-नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

पंतप्रधानांचा संपूर्ण कार्यक्रम पाहण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा.

## भारतीय पंतप्रधानांचा प्रथमच स्लोव्हाकिया दौरा

1993 मध्ये राजनैतिक संबंध प्रस्थापित झाल्यापासून भारत आणि स्लोव्हाकिया यांनी पारंपरिक मैत्री, विश्वास, समानता आणि परस्पर सन्मान यांच्या आधारावर बहुआयामी सहकार्य विकसित केले आहे. दोन्ही देशांमधील आर्थिक सहकार्यासाठी संभाव्य क्षेत्रे ओळखून त्यामध्ये प्रोत्साहन देण्यासाठी भारत–स्लोव्हाकिया संयुक्त आर्थिक समितीची भूमिका अधिक बळकट करण्यावर सहमती झाली. पंतप्रधान मोदी आणि स्लोव्हाकियाचे पंतप्रधान यांनी बैठकीत वाढत्या आर्थिक, व्यापारी आणि लोकांमधील देवाणघेवाणीला चालना देण्यासाठी थेट हवाई संपर्काच्या शक्यता लक्षात घेण्यास प्रोत्साहन दिले. तसेच शिक्षण आणि विज्ञान क्षेत्रातील परस्पर सहकार्य अधिक दृढ करण्याच्या उद्देशाने विद्यार्थी, शिक्षण तज्ज्ञ आणि संशोधक यांच्यातील देवाणघेवाणीला प्रोत्साहन देण्याबाबत दोन्ही नेत्यांनी सहमती दर्शविली.



## 'ऑर्डर ऑफ द व्हाईट डबल क्रॉस, फर्स्ट क्लास' सन्मान

स्लोव्हाकियाचे राष्ट्रपती पीटर पेलेग्रिनी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना स्लोव्हाकियाचा सर्वोच्च नागरी सन्मान 'ऑर्डर ऑफ द व्हाईट डबल क्रॉस, फर्स्ट क्लास' प्रदान केला. हा प्रतिष्ठेचा सन्मान दिल्याबद्दल पंतप्रधान मोदी यांनी स्लोव्हाकियाचे राष्ट्रपती आणि तिथल्या जनतेचे आभार मानले. त्यांनी हा सन्मान भारतातील 1.4 अब्ज नागरिकांना आणि भारत–स्लोव्हाकिया यांच्यातील मैत्रीपूर्ण संबंधांना समर्पित केला.

**पंतप्रधान मोदी यांना आतापर्यंत एकूण 34 देशांनी आपला सर्वोच्च सन्मान प्रदान केला आहे.**



सब का विश्वास, सब का प्रयास' या तत्त्वांवर आधारित भारताच्या सर्वसमावेशक विकासाचा उल्लेख केला. फ्रान्समधील एवियनमध्ये आयोजित जी-7 शिखर परिषदेत त्यांनी 'सर्वांसाठी संतुलित, सामायिक आणि टिकाऊ आर्थिक विकासाकडे वाटचाल' या विषयावर आयोजित सत्रासाठी उपस्थितांना संबोधित केले. तसेच 'एन्श्योरिंग ए सेफ, रॅपिड ॲण्ड एफिशिएंट रोल-आऊट ऑफ आर्टिफिशिअल इंटेलिजन्स' अर्थात 'कृत्रिम बुद्धिमत्तेच्या सुरक्षित, वेगवान आणि परिणामकारक वापराची सुरुवात निश्चित करणे' या विषयावरील सत्रात उपस्थितांना त्यांनी संबोधित केले. जी-20 अध्यक्षपदाच्या काळात भारताच्या सर्वसमावेशक विकासाचा मंत्र 'एक पृथ्वी, एक कुटुंब, एक भविष्य' या ब्रीदवाक्यातून जगासमोर मांडला होता. याच प्रकारचा दृष्टिकोन भारत

**दुसऱ्या महायुद्धात स्लोव्हाकियाच्या स्वातंत्र्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावणाऱ्या शूर जवानांना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी श्रद्धांजली अर्पण केली.**

– पश्चिम आशिया – युरोप आर्थिक कॉरिडॉर या संकल्पनेचाही पाया आहे. पुरवठा साखळ्यांचे बळकटीकरण, गुंतवणूक आणि रोजगाराच्या संधी निर्माण करणे, तसेच नवोन्मेषाला चालना देणे ही या उपक्रमाची उद्दिष्टे आहेत. संकटे आणि संघर्षांचा ग्लोबल साउथमधील देशांवर गंभीर आणि प्रतिकूल परिणाम झाला आहे. या देशांवरील वाढता भार कमी करण्यासाठी पंतप्रधान मोदी यांनी आंतरराष्ट्रीय एकजूट आणि सहकार्याचे आवाहन केले. त्यांनी सुचविले की आंतरराष्ट्रीय वित्तीय

## 'भारत इनोव्हेट्स 2026' कार्यक्रमात पंतप्रधान मोदी सहभागी

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रों यांनी संयुक्तरित्या नाईस इथे 'भारत इनोव्हेट्स 2026' या कार्यक्रमाचे उद्घाटन केले. 'भारत इनोव्हेट्स' या कार्यक्रमात भारतीय डीप-टेक् स्टार्टअप्, नवोन्मेषी, संशोधक, गुंतवणूकदार आणि जागतिक नवोन्मेष निधी एका व्यासपीठावर एकत्र आले. जगभरातील 350 हून अधिक प्रमुख गुंतवणूकदार आणि व्हेंचर कॅपिटलिस्ट या कार्यक्रमात सहभागी झाले होते. स्टार्टअपचे मूल्यमापन केवळ त्यांच्या बाजारमूल्यावरून नव्हे, तर मानव जातीवर होणाऱ्या त्यांच्या परिणामावरून केले पाहिजे, असे पंतप्रधान मोदी यांनी यावेळी सांगितले. त्यांनी क्वांटम कॉम्प्युटिंग, सेमीकंडक्टर, जैवतंत्रज्ञान, संरक्षण, अंतराळ, आरोग्य सेवा, मेडटेक्, प्रगत साहित्य, स्वच्छ ऊर्जा आणि इतर विविध क्षेत्रांतील अनेक स्टार्टअप व नवोन्मेषींशीही संवाद साधला.




पंतप्रधानांचा संपूर्ण कार्यक्रम पाहण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा.




## पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची भेट

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची जी-7 शिखर परिषदेदरम्यान महत्त्वपूर्ण भेट झाली. या भेटीत दोन्ही नेत्यांनी द्विपक्षीय तसेच जागतिक महत्त्वाच्या मुद्द्यांवर सविस्तर चर्चा केली. पंतप्रधान मोदी यांनी होर्मुझ सामुद्रधुनीत सुरक्षित आणि अखंड सागरी व्यापार सुरू राहण्याचे तसेच नाविकांच्या सुरक्षेचे महत्त्व अधोरेखित केले. पश्चिम आशियात होत असलेले युद्ध थांबवून तिथे शांतता प्रस्थापित करण्यासाठी राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी केलेल्या प्रयत्नांचे त्यांनी कौतुकही केले. याशिवाय, फेब्रुवारी 2025 मध्ये झालेल्या वॉशिंग्टन बैठकीनंतर संरक्षण, आधुनिक तंत्रज्ञान, ऊर्जा आणि व्यापार क्षेत्रांत झालेल्या प्रगतीचा दोन्ही नेत्यांनी आढावा घेतला. भारत–अमेरिका व्यापार करारासंदर्भात सुरू असलेल्या चर्चेबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. दोन्ही देशांना हितकारक समतोल करार शक्य तितक्या लवकर तयार करण्याचे निर्देश त्यांनी आपापल्या अधिकाऱ्यांना दिले.

संस्थांनी विकसनशील देशांना आर्थिक लवचिकता प्रदान करू शकतील अशी सहाय्यक यंत्रणा विकसित केल्या पाहिजेत. संपर्क आणि व्यापाराला गती देण्यासाठी 'इम्पॅक्ट' अर्थात आंतरराष्ट्रीय मोबिलायझेशन भागीदारी' स्थापन करण्याचा प्रस्ताव पंतप्रधान मोदी यांनी मांडला. या उपक्रमाद्वारे जी-7 चे भांडवल, भारताची प्रतिभा आणि ग्लोबल साउथमधील देशांचे स्वामित्व यांना एकत्र आणता येईल.

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रोन यांच्यात परिषदेदरम्यान झालेल्या बैठकीत भारत आणि फ्रान्स द्विपक्षीय संबंध अधिक दृढ करण्याबाबत चर्चा झाली. त्या अंतर्गत आगामी पाच वर्षांत द्विपक्षीय व्यापार दुप्पट करणे, तसेच लघु उद्योग, रेल्वे आणि विमान वाहतूक क्षेत्रांतील सहकार्य वाढविण्याचा निर्णय झाला. दोन्ही नेत्यांनी अंतराळ क्षेत्रातील खासगी कंपन्यांना प्रोत्साहन देणे आणि 'होरायझन 2047 रोडमॅप'च्या माध्यमातून तंत्रज्ञान व नवोन्मेश अधिक बळकट करण्याबाबत चर्चा केली. शिक्षण क्षेत्रात कानपूर इथे एरोनॉटिक्ससाठी 'उत्कृष्टता केंद्र' स्थापन करण्याचे ठरले. तसेच, फ्रेंच विद्यापीठांना भारतात आपल्या शाखा सुरू करण्यासाठी आमंत्रण दिले आहे. याशिवाय, लोथल इथल्या सागरी वारसा परिसरासह दोन्ही देशांतील संग्रहालयांमध्ये सांस्कृतिक सहकार्य वाढविणे आणि युक्रेन व पश्चिम आशिया यांसारख्या जागतिक प्रश्नांवर सविस्तर चर्चा झाली. ■



# भारत - सेशेल्स मैत्रीची 50 सुवर्ण वर्षे

*हिंदी महासागरातील भारताचा प्रमुख सागरी शेजारी आणि सामरिक भागीदार असलेल्या सेशेल्ससोबतच्या राजनैतिक संबंधांच्या 50 व्या वर्धापन दिनानिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 27 ते 29 जून दरम्यान सेशेल्सचा दौरा केला. या भेटीदरम्यान दोन्ही देशांमध्ये अनेक महत्त्वाचे करार तर झालेच, पण पंतप्रधान मोदी हे सेशेल्सच्या राष्ट्रीय सभेला संबोधित करणारे पहिले भारतीय पंतप्रधानही ठरले. इतकेच नाही तर सेशेल्सच्या राष्ट्रीय दिनाच्या सुवर्ण महोत्सवी सोहळ्यात सन्माननीय अतिथी म्हणून उपस्थित राहून त्यांनी दोन्ही देशांमधील घनिष्ठ होणाऱ्या संबंधांना दिली नवी उंची...*

सेशेल्सच्या दौऱ्यावर असलेल्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सेशेल्सचे अध्यक्ष डॉ. पॅट्रिक हर्मिनी यांच्यासोबत द्विपक्षीय चर्चा केली. या चर्चेत आरोग्य, शिक्षण, कौशल्य विकास, डिजिटल परिवर्तन, शाश्वत विकास, सामाजिक पायाभूत सुविधा, नवीकरणीय ऊर्जा, सागरी सुरक्षा आणि संरक्षण या क्षेत्रांमधील सहकार्यावर दृढ एकमत झाले. हिंदी महासागर क्षेत्रात



## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना 'गार्डियन ऑफ द ब्लू होरायझन' पुरस्काराने करण्यात आले सन्मानित

सेशेल्सचे अध्यक्ष डॉ. पॅट्रिक हर्मिनी यांच्या हस्ते पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना 'गार्डियन ऑफ द ब्लू होरायझन' या विशेष अध्यक्षीय सन्मानाने गौरवण्यात आले. पंतप्रधानांना त्यांच्या हरित नेतृत्वासाठी, विकसनशील देशांचे हित साधण्याच्या प्रयत्नांसाठी आणि नील अर्थव्यवस्था, हवामान बदल व सागरी संसाधन व्यवस्थापनाप्रती असलेल्या त्यांच्या दीर्घकालीन वचनबद्धतेसाठी हा सन्मान प्रदान करण्यात आला. हा सन्मान क्षमता विकास, पर्यावरण संरक्षण, शाश्वत विकास उपक्रम आणि सामायिक प्राधान्यक्रम पुढे नेण्यातील भारताच्या वाढत्या भूमिकेला सेशेल्सद्वारे दिले जाणारे महत्त्व दर्शवतो.

## सेशेल्सच्या स्वातंत्र्याचा 50 वा वर्धापन दिन


पंतप्रधान मोदी सेशेल्सच्या 50 व्या वर्धापन दिनाच्या सोहळ्याला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहिले. सेशेल्सच्या स्वातंत्र्य दिनाच्या सोहळ्याला उपस्थित राहणारे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे पहिले भारतीय पंतप्रधान आहेत. सेशेल्सच्या स्वातंत्र्याच्या सुवर्ण महोत्सवानिमित्त आयोजित राष्ट्रीय संचलनात भारतीय सशस्त्र दलाच्या तुकड्यांनीही सहभाग घेतला.

## दौऱ्याशी संबंधित महत्त्वपूर्ण बाबी...

- भारत आणि सेशेल्स यांच्यातील संपर्क वाढवण्यासाठी होतील प्रयत्न, यामुळे दोन्ही देशांमधील व्यापार वाढेल.
- डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधांमधील भारताचा यशस्वी अनुभव सेशेल्ससोबत सामायिक केला जाईल
- भारत सेशेल्सच्या नागरी सेवकांच्या प्रशिक्षणात देईल योगदान
- जन औषधीवरील सामंजस्य करारामुळे येथील लोकांना दर्जेदार आणि परवडणारी औषधे उपलब्ध होतील.
- दोन्ही देशांनी अवकाश क्षेत्रात एकत्र पुढे जाण्याचा निर्णय घेतला आहे.

## सेशेल्सच्या राष्ट्रीय सभेला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केला संबोधित

पंतप्रधान नरेंद्र मोदी हे सेशेल्यच्या राष्ट्रीय सभेला संबोधित करणारे पहिले भारतीय पंतप्रधान ठरले. ते म्हणाले "हिंद महासागर क्षेत्रामधला हा पहिला देश आहे, जिथे मी 2015 मध्ये पंतप्रधान म्हणून भेट दिली होती. पंतप्रधान म्हणून अफ्रिकेतील कोणत्याही देशाला दिलेली ही माझी पहिली भेटही होती. मी येथे आलो कारण माझा ठाम विश्वास होता की, भारताच्या दृष्टिकोनात सेशेल्सच्या हिंद महासागर क्षेत्रासाठी विशेष स्थान आहे. आज, जेव्हा मी एका दशकानंतर पुन्हा येथे आलो आहे. तेव्हा हा दृढ विश्वास पूर्वीपेक्षा अधिक बळकट झाला आहे." पंतप्रधान मोदी पुढे म्हणाले, आपली मैत्री ही गेल्या पन्नास वर्षांपूर्वीच्या आपल्या राजनैतिक संबंधाच्या स्थापनेपासून सुरू झालेली नाही. तिची सुरुवात त्याआधी ही झालेली आहे. ऑगस्ट १७७० मध्ये ईस्ट इंडिया कंपनीच्या एका व्यापारी जहाजावरील प्रवाशांमध्ये पाच भारतीय होते. त्या प्रवासाने अनेक लोकांना मार्ग दाखवला, जे त्यानंतर येथे स्थायिक झाले.



### भारताकडून सेशेल्सला भेट

| | |
|---|---|
| एक वेगवान गस्ती नौका भेट देण्यात आली. | |
| सेशेल्स संरक्षण दलाला 10 उपयुक्त वाहने आणि 5 लेझर रेडियल-श्रेणीच्या बोटी | |
| 6 | रुग्णवाहिका |
| 500 | मेट्रिक टन तांदूळ |
| 8500 | मेट्रिक टन सिमेंट |

अंमली पदार्थांची तस्करी आणि समुद्री चाचेगिरी यांसारख्या आव्हानांसह प्रादेशिक आणि जागतिक घडामोडींवर चर्चा झाली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सेशेल्सच्या विकासाच्या प्राधान्यक्रमांना पाठिंबा देण्याची आणि दोन्ही देशांमधील घनिष्ठ व चिरस्थायी भागीदारी अधिक दृढ करण्याची भारताची वचनबद्धता पुन्हा एकदा व्यक्त केली. भारत आणि सेशेल्स यांच्यातील राजनैतिक संबंधांच्या स्थापनेला 50 वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त दोन्ही नेत्यांनी एका संयुक्त स्मारक बोधचिन्हाचेही अनावरण केले. ■

पंतप्रधानांचा संपूर्ण कार्यक्रम पाहण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा.

महिला क्रीडाजगताचे सुवर्ण युग

# खेलो इंडियापासून जागतिक मंचापर्यंत




*आजचा भारत बदलत आहे. या बदलाचे एक प्रत्ययकारी चित्र पुन्हा एकदा खेळाच्या मैदानावरून समोर आले आहे. प्रतिकूल परिस्थितीवर मात करत महिला खेळाडूंनी केवळ आंतरराष्ट्रीय स्तरावर तिरंगा फडकवला नाही, तर आपल्या लाखो तरुणांना नवी स्वप्ने पाहण्यासाठी प्रेरितही केले आहे. ऑलिम्पिकच्या मंचापासून ते क्रिकेटच्या मैदानांपर्यंतची या कन्यांची उत्कृष्ट कामगिरी हे सिद्ध करते की जेव्हा राष्ट्रसन्मान उंचावण्याचा प्रश्न येतो तेव्हा नव्या भारताची स्त्रीशक्ती अतुलनीय आहे. या संदर्भात महिला हॉकीपटू आणि खेळाडूंनी जागतिक स्तरावर वाढवली आहे देशाची प्रतिष्ठा...*

पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा, योग्य प्रोत्साहन आणि 'खेलो इंडिया' सारख्या दूरदर्शी सरकारी धोरणांचा प्रभाव देशाच्या क्रीडा क्षेत्रात स्पष्टपणे दिसून येत आहे. लहान गावे आणि शहरांमधून आलेल्या महिला खेळाडू आता जागतिक स्पर्धांमध्ये इतिहास घडवत आहेत. सरकारच्या सततच्या पाठिंब्याने आणि आधुनिक सुविधांनी त्यांच्या प्रतिभेला अधिक वाव दिला आहे. भारतीय महिला हॉकी संघाने एफआयएच हॉकी महिला नेशन्स कप 2026 जिंकून देशाला अभिमान मिळवून दिला आहे. यजमान न्यूझीलंडला 2-0 ने पराभूत करून भारताने दुसऱ्यांदा ही ट्रॉफी जिंकली.





दरम्यान, दुसरीकडे आशियाई ॲथलेटिक्स अजिंक्यपद 2026 मध्ये भारतीय महिलांच्या 4x100 मीटर रिले संघाने सुवर्णपदक जिंकून तिरंग्याची शान वाढवली. ऑलिम्पियन श्रावणी नंदा, स्नेहा शानुवल्ली, सुदेशना शिवंकर आणि तमन्ना यांनी महिलांच्या 4x100 मीटर रिलेच्या अंतिम फेरीत 43.85 सेकंदांची हंगामातील सर्वोत्तम वेळ नोंदवून प्रथम क्रमांक पटकावला.

या ऐतिहासिक कामगिरीने पुन्हा एकदा सिद्ध केले आहे की संधी आणि संसाधने मिळाल्यास भारताच्या मुली कोणत्याही क्षेत्रात जागतिक स्तरावर आपली छाप सोडू शकतात. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी समाज माध्यमांवरील एका पोस्टमध्ये म्हटले आहे की भारतीय हॉकी खेळाडूंनी अभिमान आणि आनंद मिळवून दिला आहे. 'एफआयएच हॉकी महिला नेशन्स कप जिंकल्याबद्दल महिला संघाचे अभिनंदन. संघाने संपूर्ण स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी केली. संघाला शुभेच्छा. आशा आहे की हा विजय इतर अनेक खेळाडूंना हॉकी खेळण्यासाठी प्रेरणा देईल.' ▪



**Narendra Modi**
@narendramodi

2014 पासून आम्ही मोठ्या धोरणात्मक सुधारणा लागू केल्या आहेत. परिणामी, संरक्षण उत्पादनात झपाट्याने वाढ झाली असून आपल्या संरक्षण निर्यातीतही अभूतपूर्व वेगाने वाढ झाली आहे.



**Rajnath Singh**
@rajnathsingh

भारतीय सशस्त्र दले ही नेहमीच राष्ट्रीय एकतेचे प्रतीक राहिले आहेत. येथे भाषा, प्रदेश, जात किंवा प्रांत नव्हे, तर राष्ट्र सर्वोच्च आहे. आपली सशस्त्र दले त्याच एकतेचे प्रतीक आहेत, जिथे विविधता हीच त्यांची सर्वात मोठी ताकद आहे.



**Amit Shah**
@AmitShah

मोदीजींच्या नेतृत्वाखाली तंत्रज्ञान-आधारित सुशासनाच्या क्षेत्रात आज आणखी एका महत्त्वाच्या अध्यायाची भर पडत आहे. 'अकिली केलार ट्रॅकऑन' (FCT) या प्रायोगिक प्रकल्पाचे आज गांधीनगरमध्ये उद्घाटन करण्यात आले. हे डॅशबोर्ड विविध प्रकारचा डेटा एकत्रित करून केंद्र आणि राज्य सरकारच्या कल्याणकारी योजनांचे लाभ थेट गरजू कुटुंबांच्या घरापर्यंत पोहोचवेल. सोबतच पीएम ई-बस सेवेलाही हिरवा झेंडा दाखवला गेला.



**Nitin Gadkari**
@nitin_gadkari

सशक्त शेतकरी, समृद्ध राष्ट्राच्या दिशेने आणखी एक पाऊल
देशातील शेतकऱ्यांसाठी वरदान ठरत असलेल्या प्रधानमंत्री किसान सन्मान निधी (पीएम-किसान) योजनेच्या 23 व्या हप्त्याचे वितरण पंतप्रधान @narendramodi जी यांच्या हस्ते झाले. पश्चिम बंगालच्या हुगळीतील तारकेश्वर येथे आयोजित या कार्यक्रमादरम्यान देशातील 9.44 कोटींहून अधिक शेतकऱ्यांच्या बँक खात्यांमध्ये ₹2,18,880 कोटींहून अधिक रक्कम थेट लाभ हस्तांतरणाद्वारे (DBT) हस्तांतरित करण्यात आली.



**Jyotiraditya M. Scindia**

'संचार साथी' आपले काम उत्तमरीत्या करत आहे – नागरिकांना त्यांचे हरवलेले किंवा चोरीला गेलेले फोन परत मिळवून देत आहे.
तुमच्या फोनचा खरा 'साथी'.
#SancharSaathi



**Ram Mohan Naidu Kin...**
@RamMNK

'मेड इन इंडिया' सी-295 हे एक सशक्त अवकाश परिसंस्था, सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांसाठी तसेच कुशल मनुष्यबळासाठी अधिक संधी आणि आत्मनिर्भर भारताप्रती असलेला दृढ संकल्प दर्शवते.

भारत की लीडरशिप पर 4 फीसदी लोगों को बहुत ज्यादा भरोसा

अमेरिका और चीन पर घटा ऑस्ट्रेलियाई लोगों का विश्वास

ऑस्ट्रेलियाई सर्वे में लोगों को भारत पर सबसे ज्यादा भरोसा

## विश्वसनीयता में चीन, अमेरिका को पीछे छोड़ कई गुना आगे निकल गया भारत




भारत में सरकार की स्थिरता का फायदा

# डिजिटल अरेस्ट और साइबर अपराध पर मोदी सख्त

## समीक्षा बैठक में समयबद्ध कार्रवाई के निर्देश



नई दिल्ली, 24 जून (एजेंसी) : प्रधानमंत्री नरेन्द्र मोदी ने डिजिटल अरेस्ट और साइबर अपराध की बढ़ती घटनाओं पर चिंता व्यक्त की और कहा कि ऐसे मामलों में सभी संबंधित एजेंसियों को समन्वित, संवेदनशील और समयबद्ध तरीके से कार्रवाई करनी चाहिए। मोदी ने ये टिप्पणियां साइबर अपराध और 'डिजिटल अरेस्ट' के जरिए होने वाली धोखाधड़ी से जुड़ी शिकायतों की समीक्षा के दौरान कीं।

प्रधानमंत्री ने यह समीक्षा 'प्रगति' की 52वीं बैठक में की। मोदी ने कहा कि लोगों को एक विभाग या एजेंसी से दूसरे विभाग के चक्कर काटने के लिए मजबूर नहीं किया जाना चाहिए।

### 4 परियोजनाओं की समीक्षा

मोदी ने चार राज्यों में सड़क, बिजली, औद्योगिक गलियारे और मेट्रो रेल क्षेत्रों से जुड़ी करीब 30,000 करोड़ रुपए की चार परियोजनाओं की भी समीक्षा की।

## नीट पुनर्परीक्षा सुचारू रूप से कराने की पीएम ने प्रशंसा की

प्रधानमंत्री ने बुधवार को केंद्रीय मंत्रिमंडल की बैठक में, विभिन्न विभागों के बीच तालमेल पर जोर दिया और 'नीट-यूजी' पुनर्परीक्षा सुचारू रूप से संपन्न कराने के लिए किये गए प्रयासों की प्रशंसा की। सूत्रों ने बताया कि प्रधानमंत्री ने पूरे सरकारी तंत्र के मिलकर काम करने और विभिन्न मंत्रालयों के बीच तालमेल पर जोर दिया।

## विकसित भारत के लिए एआइ का जिम्मेदारी के साथ उपयोग जरूरी



## मन की बात में पीएम मोदी की अपील, गणेश प्रतिमा मिट्टी की ही लें, पीओपी वाली न खरीदें





## हिंद महासागर को अवसरों का महासागर बनाना लक्ष्य : मोदी

सुरक्षा के साथ आर्थिक समृद्धि... प्रधानमंत्री ने स्पष्ट किया साझा का संदेश



## यूपीआई लागू करने समेत 19 करार

# सागरी सुरक्षेचे खंबीर रक्षक...

*एखाद्या देशाचे सागरी सामर्थ्य जेवढे अधिक असते, तेवढाच त्याचा आर्थिक आणि सामरिक प्रभावही अधिक मजबूत असतो. भारत यासाठी स्वतःला तयार करत आहे. याच संदर्भात 21 जून रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारतीय नौदलाच्या तीन आधुनिक जहाजांचे लोकार्पण केले: आयएनएस दूनागिरी, आयएनएस संशोधन आणि आयएनएस अग्रय, ही जहाजे 75% पेक्षा जास्त स्वदेशी सामग्री वापरून बांधण्यात आली आहेत. हे एक संतुलित आणि मोहिमेसाठी सज्ज नौदल, एक मजबूत संरक्षण उत्पादन परिसंस्था आणि 'आत्मनिर्भर भारता'प्रती असलेली अढळ वचनबद्धता या दिशेने भारताच्या वाढत्या क्षमतांचे प्रतीक आहे...*



पंतप्रधानांचा संपूर्ण कार्यक्रम पाहण्यासाठी क्यूआर' कोड स्कॅन करा.

## आयएनएस दूनागिरी

- प्रोजेक्ट 17ए अंतर्गत बीलगिरी वर्गातील पाचवी युद्धनौका.
- सुपरसॉनिक क्षेपणास्त्रे, प्रगत हवाई संरक्षण प्रणाली आणि पाणबुडीविरोधी शस्त्रास्त्रांनी सुसज्ज.
- हेलिकॉप्टर संचालन क्षमतेमुळे तिची देखरेख आणि संहार क्षमता आणखी वाढते.



## आयएनएस संशोधक

- विशाल सर्वेक्षण जहाज वर्गातील चौथे जहाज
- अत्याधुनिक हायड्रोग्राफिक आणि समुद्रशास्त्रीय प्रणालींनी सुसज्ज.
- अचूक सागरी सर्वेक्षण करते. गरज पडल्यास रुग्णवाहिका जहाज म्हणून वापरता येते.
- हेलिकॉप्टर संचालन सुविधेने याची बहुउद्देशीय क्षमता वाढवली आहे.



## आयएनएस अग्रय

- भारतीय नौदलाची उथळ पाण्यातील पाणबुडीविरोधी युद्धनौका
- एएसडब्ल्यू-एसडब्ल्यूसी मालिकेतील पाचवे जहाज.
- अत्याधुनिक सोनार, टॉर्पेडो आणि पाणबुडीविरोधी रॉकेटनी सुसज्ज.
- वॉटर जेट तंत्रज्ञानामुळे जलद आणि चपळाईने काम करते.



न्यू इंडिया समाचार पाक्षिक

आर.एन. आय, DELHIN/2020/78812, 16-31 जुलै, 2026

आर.एन. आय DELHIN/2020/78812 (प्रकाशन दिनांक 30 जून 2026, एकूण पृष्ठ-48)

मुख्य संपादक
धीरेन्द्र ओझा, मुख्य महासंचालक
पत्र सूचना कार्यालय, नवी दिल्ली

प्रकाशक
कंचन प्रसाद
महासंचालक, केंद्रीय संचार ब्यूरो

खोली क्रमांक-278, केंद्रीय संचार ब्यूरो,
सूचना भवन, दुसरा मजला,
नवी दिल्ली -110003 हून प्रकाशित